म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक


पुस्तकाचें नांव

282

३५

चरित्र

बुक नंबर
भिवंडी.
सार्वजनीक पुस्तकालय.
नं. १०२
का. पो.





नारायणराव त्र्यंबक ऊर्फ बापूसाहेब मेहेंदळे.

जन्म शके १७४७ भाद्रपद वद्य २ शनवार मृत्यु शके १८०९ माघ वद्य ८ शनवार.

भिवंडी.

प्रसिद्ध

भिषग्वर्य

# बापूसाहेब मेहेंदळे

मराठी ग्रंथ सं
ठाणे.

यांचें चरित्र

हें पुस्तक

## गोविंद कृष्ण टिळक

यांनीं केलें

तें

पुणें, पेठ बुधवार, येथें "अंबाप्रसाद" छापखान्यांत छापविलें. इसवी सन १८८८.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

ह्या पुस्तकसंबंधीं सर्व हक्क मालकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

किं० ०१०; ट० हां० ०१.

# पूर्वोक्ति.

प्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें आपल्या मराठी भाषेंत झालीं आहेत आणि त्यांत **श्रीमंत बाजीराव बल्लाळ, वीरवर परशुरामभाऊ पटवर्धन, श्रीमंत मल्हारराव गाइकवाड** इत्यादि नरवरांचीं आयुर्वृत्तें मनोरंजक, उपदेशपर, आणि दृष्टांतयोग्य अशीं झालीं आहेत. तशींच **वैराग्यशाली, तिरस्कृतभूलोकसुखोपभोग, परमेश्वरभक्तिपरायण, मुमुक्षु श्रीरामदासमहाराज, एकनाथस्वामी** वगैरे साधूंचीं चरित्रें प्राणिमात्रांच्या मानसीं वैराग्य उत्पन्न करण्यास सिद्ध आहेतच. परंतु ज्ञानानुरागी आणि विद्याव्यासंगी पुरुषांच्या आयुर्वृत्तान्तलेखनाची अद्यापि प्राकृत भाषेंत उणीव आहे असें ह्मणणें विशेष धाष्टर्याचें होणार नाहीं असें वाटतें. चरित्रविषय **कैलासवासी बापूसाहेब मेहेंदळे** हे विद्वद्वृंदांत मोडतात. तेव्हां त्यांचें आयुर्वृत्त लिहून वर निर्दिष्ट केलेली उणीव थोडी बहुत यथामति आणि यथासामर्थ्य भरून काढण्याचा यत्न करावा ह्या हेतूनें चरित्रकारानें प्रस्तुत पुस्तक लिहिण्याचें योजिलें. चरित्रनायकासंबंधीं जेवढी माहिती उपलब्ध होती तेवढी मिळविण्यांत त्यानें आपल्याकडून कांहीं कसूर केली नाहीं. चरित्रलेखनांत जेथें जेथें वादग्रस्त मुद्दे आले तेथें तेथें त्या मुद्यांचें यथामति

विवेचन करून निःपक्षपातबुद्धीनें आणि न्यायानें त्यानें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. जी लेखनपद्धति त्यानें अनुसरली आहे तीच अशा प्रकारचीं पुस्तकें लिहिण्यास सुलभ व योग्य आहे असें आढळून येईल. कै० बापूसाहेबांसंबंधानें कोणी खातरलायक विशेष माहिती पाठविल्यास तिचा आभारपूर्वक स्वीकार केला जाऊन द्वितीयावृत्तींत तिचा समावेश होईल.

चरित्रकार.

POONA: MARCH 26TH 1888.

I have carefully gone through this work. The author has, no doubt, taken great pains in collecting the requisite materials. He has put them together in a simple, interesting and instructive form. The language used is most elegant and touching. The author has freely critisized the controversial points to enable the reader to form his own independent opinion; and has I think rightly skipped over immaterial details. And I hope his work will find favor at least with those people, who knew or heard of the celebrated Waidya, Bapusaheb Mehendale. I am sure there can be no two opinions as the author maintains, that as a Native Waidya none could equal Bapusaheb and that the Medical profession has suffered an irreparable loss. But it is said that Bapusaheb being hot-tempered and self-willed, people could not derive the full benefit of his learning and Medical proficiency. However that may, be, Bapusaheb has done immense good to our Medical profession; he has in fact rescued it from the disrepute under which it had fallen, since the progress of the Western civilization, by setting a clear example that our Waidyas, if they study Native Medicine ernestly and in the way they ought, can hold an honourable posi-

tion among the highly advanced class of Doctors. And the name of this Waidya of Waidyas deserves to be perpetuated at least in the way the author has done.

B. M. KHARKAR, B. A.

ALIENATION ASSISTANT TO THE COMMISSIONER. C. D.

I fully endorse the above opinion.

M. K. KUMTHEKER, B. A.

MUNICIPAL SECRETARY, POONA.

# प्रस्तावना

जरा सृष्टीकडे नजर फेंकली म्हणजे ईश्वराच्या कर्तृत्वशक्तीचें कौतुक वाटल्या वांचून रहाणार नाहीं. जनन आणि मरण पाहिलें म्हणजे ज्याचें अस्तित्व भासूं लागतें; सृष्टीची अव्याहत चाललेली जी रहाटी तिच्यावरून ज्याच्या ईशतेची कल्पना येते; नानाविध संकटें ओढवलीं किंवा नाना प्रकारचे घोर प्रसंग प्राप्त झाले म्हणजे ज्याचें भय वाटतें; अशा जगन्नायकानें सृष्टि रचनेमध्यें आपलें काय काय हस्तचातुर्य खर्च केलें असेल याची कल्पना करूं लागलें असतां मनुष्य कसें थक्क होऊन दडपून जातें व त्याची गति खुंटते.

लहानशा क्षुद्र कीटकादि जीव जंतूपासून तों तहत मनुष्य प्राण्यापर्यंत, त्यानें एक प्राणि रचनारूपी शिडीच तयार केली आहे. पहिल्या पायरीपासून शेवटच्या पायरीपर्यंत स्थित्यंतर होत होत झालेला जो परिणताकार तो मनुष्य प्राणी आहे. सर्व जीवांना ज्यांच्या त्यांच्या शरीर रचनेप्रमाणें स्वजीवित रक्षणाचीं साधनें त्यानें दिलीं आहेत. त्याच मानानें त्यांच्यामध्यें सौम्य किंवा क्रूर गुण दृष्टीस पडतात. मनुष्य प्राण्यास एक मोठें साधन दिलें आहे. तें काय? तर बुद्धि. ईश्वरानें सर्व सृष्टि उपयुक्त पदार्थांनीं भरून ठेवली आहे. पण त्यांचा उपयोग जाणण्याकरितां व त्यांची प्राप्ति करून घेण्याकरितां मनुष्यानें आ-

पल्यास मिळालेल्या देणगीचा सदुपयोग केला पाहिजे.

बुद्धि सामर्थ्यानें आपले सुखोपार्जनाची साधनें वाढविणें हें एक मुख्य कर्तव्य आहे. या देणगीचा यथायोग्य व्यय झाला म्हणजे ह्या भूतलावर स्वर्गांतील सुखोपभोगांची रेलचेल करून देण्यास किती उशीर? येथें ठोका मारला कीं, विलायतेला बातमी देणें; प्रत्यक्ष चंद्रासहि लाजवूं पहाणाऱ्या कृत्रिम चंद्राची योजना करणें; थोड्या वेळांत शेंकडों मैल चालून जाणें; समुद्रपर्यटणामध्यें घरच्या पेक्षां अधिक सुखकर व आरामदायक व्यवस्थेचा उपभोग मिळणें; पेटींत पैसा टाकिला कीं, आपोआप पदार्थ बाहेर येणें; रस्त्याखालून गाड्या चालविणें; वगैरे सर्व फळें कशाचीं? अर्थात् बुद्धि सामर्थ्याचीं. सुख प्राप्ति सुलभ करणें हेंच काय तें सर्व खटपटीचें बीज. या खटपटींत ज्या मानानें प्रत्येकाचा भाग असेल त्या मानानें त्याची योग्यता कमी अधिक समजली पाहिजे. आपल्या स्वतःचे उद्योगांत यश येण्यास, त्यांत आपलें हित होण्यास आणि अप्रत्यक्ष रीतीनें मानवजातीचें सुखवृद्धिगत करण्यास ज्या सामुग्रीची अवश्यकता असेल तिची सिद्धता करणें हें व्यक्ति मात्राचें प्रधान कर्तव्य आहे. ही सामुग्री कोणची म्हणाल तर ज्ञान हें होय. केवळ प्रतिष्टा मिळवण्याकरितां किंवा लोकांवर आपले वर्चस्व बसावें म्हणून किंवा आपली स्तुति व्हावी, या हेतूनें शिकणें हें ज्ञान संपादन नव्हें. पण प्रचारांत सन्मानार्थ शिकण्याची इच्छाच प्रबल दिसते.

शोभेनें नेहमीं आपलें वर्चस्व उपयोगावर बसविलें आहे असें आढळून येतें. शोभेकरितां उन्हाळ्यांत बकऱ्याचीं कातडीं पांघरून मिरविणाऱ्या व पावसाळ्यांत तीं भिजतील म्हणून नग्न फिरणाऱ्या आफ्रिकनापासून तों सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या आंग्लभौमापर्यंत, उपयोगाचे पूर्वीं मंडनक्रियेचें अस्तित्व दिसून येतें. शरीरास त्रास होवो, दुःख होवो, पण सौख्यापेक्षां भूषणाकडे लक्ष्य जास्त. स्त्रियांत काय, व पुरुषांत काय, ही गोष्ट सर्वत्र प्रत्यंतरास येईल. ही जशी शरीराची स्थिति त्या प्रमाणेंच मनाचीहि स्थिति आहे. ज्या ज्ञानानें आपलें कल्याण होणार, आपल्याला उपयोग होणार, त्या ज्ञानापेक्षां, ज्या ज्ञानानें आपली वाहवा होईल तें ज्ञान संपादण्याची हौस पहिल्या प्रथम. तर मग असें तें ज्ञान तरी कोणतें? निरनिराळ्या नात्यानें जे जे व्यवहार आपणास ह्या जगांत करावे लागतात ते ते व्यवहार चोख रीतीनें बजावण्यास ज्याचें सहाय्य लागतें तें ज्ञान संपादणें योग्य; व हें म्हटलें म्हणजे शास्त्र ज्ञान होय. प्रत्येक कामांत ह्या ज्ञानाची उपयुक्तता आहे. शेतकी, व्यापार, कारागिरी, शिल्प, चित्रें काढणें, ग्रंथ लिहिणें, काव्य करणें, काव्योपभोग घेणें, वगैरे सर्व धंद्यांत कोणत्यानां कोणत्या तरी शास्त्राची माहिती लागते व ती नसल्यास त्या धंद्यांत पूर्ण यश मिळत नाहीं तर शास्त्राध्ययन करून आपला उपयोग करून घेणारे व आपलें हित साधणारे लोक सन्मान्य होत. मग आ-

पलें कल्याण करून, शिवाय हजारों लोकांवर उपकार करणारे पुरुष पूज्यच आहेत. पण असे पुरूष फार विरळा निपजतात, आणि असे जे कोणी महात्मे निपजतात त्यांच्या कृतींचें श्रवण व अवलोकन अवश्य झालें पाहिजे. ते आपली सुधारणा कशी करतात, ते ज्ञान कसें संपादितात, आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांनां किती करून देतात, त्यांच्यांत दोष मुळींच नसतात कीं काय? असल्यास ते दोष कां राहिले, इत्यादि गोष्टी कळणें व त्यांत चांगलें असेल त्याचा कित्ता गिरवणें हितकर आहे, आणि याच उद्देशानें गुणी जनांच्या कृतींचें वर्णन त्यांच्या चरित्ररूपानें करणें योग्य होय.

ज्या मोठमोठ्या लोकांच्या चरित्र लेखनानें अथवा चरित्र वाचनानें आपलें मनोरंजन होऊन दोन हिताच्या गोष्टी समजतात, त्या मोठ्या लोकां पैकींच आमच्या चरित्राचे नायक हे आहेत. त्यांत विशेष असें कीं, या विद्वान गृहस्थानें स्वबुद्धिबलानें संपादित केलेल्या ज्ञान बाहुल्याचा प्रसाद शेंकडों लोकांस दिला आणि त्या मुळेंच त्यांची कीर्ति अजरामर राहील. हे गृहस्थ आपल्या गुणांनीं आपल्या भक्त जनांस फार प्रिय झाले होते. यांच्यापासून अनेक प्रकारांनीं पुष्कळांस उपयोग झाला आहे. हे तर आतां परलोकवासी झालेच, तथापि त्यांच्यामागें त्यांची कीर्ति मात्र त्यांच्या अस्तित्वाची जागरूकता सर्वांनां भासविण्यास राहिली आहे.

# पूर्वार्ध.

असे जे भिषग्वर्य बापूसाहेब मेहेंदळे यांचा जन्म शके १७४७ भाद्रपद वद्य २ द्वितीया शनवार रोजीं झाला. बापूसाहेबांचा जन्म ज्या कुळांत झाला, तें कुळ पुण्यांतील संभावित व बाळबोध कुळांपैकीं एक आहे. मेहेंदळे यांच्या घराण्यांतील पुरुष पेशवाईंत फारच प्रसिद्ध होते. बापूसाहेबांचे पणजे मोरोपंत मेहेंदळे. ह्यांच्या संबंधानें एकदोन चमत्कारिक गोष्टी ऐकिवांत आहेत. हे गृहस्थ फार ईश्वरभक्तिपरायण असत. एके प्रसंगीं हे भजनपूजनादि कर्मांत निमग्न झाले असतां कांहीं महत्वाच्या व जरूरीच्या कामाचीं पुडकीं यांच्याकडे तयार करण्याकरितां धाडलीं होतीं. त्यांनीं तीं तशींच ठेविलीं. सकाळीं सदरहु कागद मागण्याकरितां जेव्हां सरकारचा स्वार आला तेव्हां यांची स्वारी मोठ्या लगबगीनें उठून कांहीं कोरे कागद बरोबर घेऊन श्रीमंतांकडे गेली. जो मजकूर ल्याहावयाचा होता तो त्यांनीं कोरेकागदांवरून वाचून दाखविला. हें पाहून सन्निध असणारा हुजऱ्या हसला. श्रीमंतांनीं हुजऱ्यास हसण्याचें कारण विचारितां, त्यानें असें उत्तर दिलें कीं, कोणी कोरे कागद वाचतांना म्यां पाहिलें नव्हतें. परंतु आज तसें मला पहायास सांपडलें ह्मणून मला हसूं आलें.

असें ऐकून **श्रीमंतांनीं** कागद पहावयास मागून घेतले तों ते कोरेच आहेत असें त्यांनां आढळून आलें. **मोरोपंतांचे** हुशारीबद्दल त्यावेळीं **श्रीमंतांनीं** त्यांची मोठी प्रशंसा केली.

बापूसाहेब यांचे आजोबास **श्रीमंत सवाईमाधव**-राव साहेब पेशवे यांचे कारकीर्दींत लष्करी फडनविशीचें काम होतें. ज्यावेळीं **पेशवाई** अगदीं वैभव-शिखरास जाऊन पोहोंचली होती, **पेशव्यांच्या** नांवाचा जिकडे तिकडे दरारा होता, त्यांच्या अधिकार आणि पराक्रमबलाचे झेंडे चारी दिशास फडकत होते, त्यावेळीं **पेशव्यांचे** पदरीं जीं चार नांव घेण्यासारखीं माणसें होतीं त्यांपैकीं **बापूसाहेब** यांचे आजे हे एक होत. **विनायकराव** मेहेंदळे हे खर्ड्याचे लढाईंत व वडगांवचे लढाईंत हजर होते, व त्यावेळीं हे बरेच प्रसिद्धीसहि आले होते. त्यांच्यावर **श्रीमंतांचा** लोभ असे; त्यानां बारापंधरा हजार रूपये सालिना मिळत असत. वंशपरंपरें जहागीरकरून घेण्याचें त्यांनीं नाकारिलें. कारण विचारितां त्यांनीं असें सांगितलें कीं, आमच्या स्नानसंध्येची पुण्याई जहागीर घेतली ह्मणजे सरकारास जाते ह्मणून आह्मांस जहागीर नको. **बापूसाहेबांचे** वडील **त्रिंबकराव** ऊर्फ **आबासाहेब** मेहेंदळे हे राजसेवेमध्यें आपला काळ न घालवितां वडीलोपार्जित द्रव्यावर आपला निर्वाह करून स्नानसंध्येंत वेळ घालवीत. **बापूंची** आई ही पंचनदीचे **मोडक** यांचे घराण्यांतील होती. **बापूंचे**

जन्मवृत्त कथन मोठें आश्चर्यकारक व मनोरंजक आहे. बापूंचे पूर्वीं त्यांचे आईस एक मुलगा होता. त्यानंतर पुढें बारा वर्षे तिचीं मुलें जगत नव्हतीं. आईनें देवादिकांस नवस केले, ब्राम्हणांची सेवा करून त्यांना संतुष्ट केले, तरी कांहीं उपयोग झाला नाहीं. रात्रंदिवस तिला मूल होण्याचा ध्यास लागला. मूल झाल्याचें सौख्य किंवा मूल मेल्याचें दुःख या दोन्ही गोष्टींची खरी कल्पना बायकांवाचून इतरांस करितां येणार नाहीं. मूल खुद्कन् हसलें म्हणजे हसणें, तें जरा रडूं लागलें कीं जीव घाबरणें, त्याच्याशीं लाडालाडानें बोलणें, त्याला गोडगोड नांवांनीं हांका मारणें, या व अशा दुसऱ्या अनेक गोष्टीपासून खरें वात्सल्य आणि खरा आनंद यांची किंमत त्यांनांच अवगत असते. असो. याप्रममाणें बरेच दिवस नियम विधिमध्यें गेले. शेवटीं एके रात्रीं तिला कोणी ब्रह्मचारी स्वप्नांत दिसला व त्यानें असा वर दिला कीं, "बाई, तूं गाईला सगळाले गहूं खावयास घाल आणि ते मल मार्गानें बाहेर पडले म्हणजे धुवून स्वच्छ कर आणि त्याची भाकर करून कांहीं दिवस खात जा; आणि गाईची सेवा कर म्हणजे तुला मोठा कीर्तिवान् पुत्र होईल." जागी आल्यावर तिला जराशी हुशारी वाटली; तिनें आपलें स्वप्न पतीस निवेदन केलें. आणि ब्रह्मचाऱ्यानें केलेल्याउपदेशाप्रमाणें क्रम आरंभिला. तिनें गाईची उत्तम प्रकारें सेवा केली. गाईस पांच लक्ष प्रदक्षणा घातल्या.

अशा सायासानें झालेले जे चिरंजीव तेच नारायणराव उर्फ बापूसाहेब हे होत.

बापूसाहेबांना एक धाकटा भाऊ होता, पण तो लहानपणींच त्याचे आंगावर वीज पडून परलोकवासी झाला. बापू आईबापांचे फार लाडके असत. बापू काय तो जीव कीं प्राण, त्याच्यासंबंधानें काय ती सर्व काळजी, त्याजवर काय तें सर्व प्रेम. बापू अंगापिंडानें चांगले धट्टेकट्टे असत. मेहेंदळ्यांचे घराण्यांतील बहुतेक पुरुष दिसण्यांत भव्य, उंच व सदृढ असे सध्याच्या पिढीपर्यंत तरी निपजत आले आहेत. बापू लहानपणीं फार व्रात्य आणि खोडकर असत. त्यांचा स्वभाव फार हट्टी असे. आईनें रागें भरावें; बापानें धमकी द्यावी; पण चिरंजीवांनीं आपली दांडगाई कधीं सोडली नाहीं. उन्हांत हिंडणें, भरपावसांत बसणें, रानांत एकटेंच जाणें, ह्यांचें बापूंस कांहींच वाटत नसे. आईनें मुलास लंगोटी नेसण्यास सांगितलें कीं, मुलानें तिच्यापुढें घोंगडी नेसून उभें रहावें. अशा प्रकारचे चाळे बापूंनीं कित्येकदां करावें. त्यांना वयाच्या पांचवें वर्षीं मोडी अक्षर शिकण्याच्या शाळेंत घातलें.

शाळेंतील पंतोजींचें नांव अण्णा ओक. बापू लहानपणापासूनच फार हुशार आणि तीव्रबुद्धि दिसत असत. मुलाची हुशारी पाहून गुरूजीस मोठा आनंद होत असे. गुरूजींनीं बापूंना दांडगाईबद्दल क्वचित्प्रसंगीं ठोक द्यावा. पण ह्या ठोकाबद्दल गुरूस

शिप्याकडून एकदां चांगलेंच बक्षीस मिळालें. नित्य क्रमाप्रमाणें सकाळीं उठून बापू अक्षर गिरविण्यास शाळेंत गेले. त्या दिवशीं त्यांनीं शाळेंत कांहीं खोडी केली, ह्मणून अण्गा पंतोजींनीं शिप्यास शिक्षा दिली. त्या वेळीं बापूंनीं ती मुकाट्यानें सहन करून घेतली. परंतु त्यांना अतिशय त्वेष येऊन त्यांनीं पंतोजीचाहि समाचार घेण्याचा मनांत निश्चय केला त्यानंतर गुरूजवळ कांहीं एक न बोलतां शाळा सुटल्यावर निमूटपणें घरीं निघून आले. घरीं शिक्षेसंबंधानें कोणापाशीं कांहीं एक उद्गार काढिला नाहीं. दोन वाजतां पुन्हां शाळेंत गेले. ते थेट पंतोजीजवळ जाऊन त्याच्या डोकीवर जोरानें पांच, चार थापट्या मारल्या आणि लागलेच घरीं निघून आले. झालेली सर्व हकीकत वडिलांस कळविली, आणि स्पष्ट सांगितलें कीं, मी पुनः शाळेंत जाणार नाहीं.

हा सर्व वृत्तांत ऐकून आपल्या मुलाच्या उद्धटपणाचे वर्तनाबद्दल आबांनां बराच राग आला. तथापि त्याच्या धीटपणाचेंहि कौतुक जरा वाटलें. मुलानें पुनः शाळेंत जावें ह्मणून त्यांनीं गोडीगुलाबीनें त्याचें मन वळविण्याची पुष्कळ खटपट केली. त्याला धमकी देऊन पाहिलें, पण कांहीं फायदा झाला नाहीं. शेवटीं, "मीं घरीं लिहूनच आपलें अक्षर उत्तम करून दाखवितों," असें त्याजकडून कबूल करवून घेतलें. बंडूनानांचे उत्तम अक्षराविषयीं त्यांना दोन शब्द सांगून उत्तेजन दिलें. आणि पुनः त्यांना

शाळेंत जाण्याविषयीं आग्रह केला नाहीं. बापूंच्या मनावर वडलांच्या उपदेशाचा परिणाम हितावह झाला. बंडूनानांच्या अक्षराप्रमाणें मलाहि अक्षर चांगलें करून दाखवितां येईल, अशी त्यांनीं उमेद बाळगिली, आणि बापाला दिलेलें वचन पूर्ण करण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केला. इतर लहान मुलांत, आणि बापूंत फरक दिसून येतो, तो पहा. इतर मुलें निश्चय करण्यांत मात्र तत्पर असतात, परंतु बापूंनीं आपला कृत संकल्प अमलांत आणिला. प्रत्येक दिवशीं दोनतीन तास खरडे लिहिण्याची त्यांनीं मेहनत घेतली. आणि आपल्या वयाच्या बारावे वर्षीं कित्ते घालण्याचा आरंभ केला. मुलानें बोलल्याप्रमाणें करून दाखविलें, हें पाहून बापास परम समाधान वाटलें, आणि पंतोजीची पूजा करण्याचाच निश्चय शेवटास नेणारा आपला मुलगा नाहीं, तर ज्ञान प्राप्तीविषयीं देखील तो बोलेल तसा वागेल अशी त्यांची खात्री झाली.

मुलास लिहितां वाचतां यावें, त्याचें अक्षर चांगलें असावें, त्याला हिशेबठिशेब करितां यावे, एवढ्या गोष्टी कायत्या गृहस्थाचे मुलांना शिकविणें अवश्यक, असा त्या वेळचे लोकांचा समज असे. शिवाय कांहीं ब्रह्मकर्महि शिकवीत असत. ह्या मानानें पाहिलें म्हणजे बापूंचें शिक्षण बाराव्या वर्षींच समाप्त झालें होतें. एवढें येथें सांगून ठेवणें पूरे आहे कीं, बापूंना लहान वयापासूनच स्वतंत्रतेचे कामाची जबाबदारी शिरावर घेऊन तें तडीस नेण्याची सवय झाली; आणि ही गोष्ट

त्यांच्या अक्षर सुरेख करून दाखविण्यावरून प्रसिद्धहि आहे.

आईवर बापूंची फार भक्ति असे. एकदां त्यांची आई कांहीं औषध तयार करीत होती. त्या औषधांत हवीतेवढी साय साखर घातल्यावर थोडी शिलक राहिली. चिरंजीव जवळच होते. त्यांनीं आईजवळ राहिलेली साय मागितली. आईने सांगितलें, "बाळा, त्यावर माझा पाय पडून त्याला घाण लागली आहेरे" बाळ बोललें, "आई, तुझाच पाय पडून घाण झालीनां? तर मग तशी मला चालेल." वारंवार आपला मुलगा जरी खोड्या करी, व सांगितलेली गोष्टनांव ऐकत नसे; तथापि आपल्या पाणीदारपणानें आईची माया चिरंजीवांनीं आपल्यावर भारी बसवून घेतली होती. एके समयीं आपल्या लाडक्या मुलाला घेऊन आपले चुलते जे रावजीमोडक त्याकडेस ती गेली होती. हे रावजीमोडक महान् भगवत्भक्त जे नाशिककर रघुनाथभटजी त्यांचे शिष्य. हे रावजीमोडक मोठे व्युत्पन्न होते. गीर्वाणभाषा म्हणजे यांनां अगदीं वश असे. हे कविता करीत. यांच्या कवितांत पदलालित्य आणि श्लेष फार, असें आढळून येतें. शास्त्री मंडळींनां त्यांच्या कविता मान्य असत. या मोडक शास्त्र्यांनीं बापूंकडे सहज पाहिलें, आणि पुतणीस सांगितलें, "तुझा मुलगा दिगांतकीर्ति होईल. याला कोणी जोड मिळणार नाहीं." पुष्कळांनीं बापूंविषयीं असे तर्क केले

होते, ते येथें सविस्तर कथन करण्याची अवश्यकता दिसत नाहीं, परंतु तीं सर्व अनुमानें शेवटीं अक्षरशः खरीं ठरलीं. ही गोष्ट अभिनंदनीय आणि स्मरणीय आहे.

बापूंनीं लहानपणीं विटकरीची धूळ करून तिच्या पुड्या बांधाव्या, तुळशीतील माती घेऊन तिच्या गोळ्या कराव्या, आणि सोबतीमंडळांत औषध ह्मणून त्या पुड्या व त्या गोळ्या वाटाव्या. अशा प्रकारची वैद्यकी खेळण्याचा बापूंनां बाल्यावस्थेंत मोठा नाद असे. उत्तरवयांत वैद्यक्रिया विशारदतेच्या वैभव-पर्वतावर जाऊन बसणाऱ्या पुरुषांची लहानपणची वैद्यक्रिया ही एक प्रकारचे डोहाळेच समजले पाहिजेत. मोठेपणाचा बापूंत्रमध्यें जो लहानपणीं अंकुर दिसला त्याचा शेवटीं विस्तीर्ण वृक्ष बनला, ही गोष्ट प्रशंसनीय होय. बापूंनां मातृसौख्य फार दिवस लाभलें नाहीं. मुलाचे सहावे वर्षीं आई उदर भावनेनें आजारी पडली. औषधोपचार चालूं होतेच. एक दिवस ती सांजा खाण्यास बसली, त्यावेळीं तिनें तोंडीं लावण्यास आलें घेतलें होतें, तेव्हां तिला जी उचकी लागली ती सात आठ दिवस चालू होती; आणि शेवटीं त्यांतच तिचा अंत झाला. मरणसमयीं तिनें आपल्या थोरल्या सुनेस मुलाला साय देण्याची काळजी ठेवण्यास सांगितलें. आणि बापू जोंवर आपल्या घरीं होते तोंवर त्या सुनबाईनींहि पण त्यांची फार मिजास ठेविली होती. उत्तर वयांत ह्या संबंधानें बापू कृतज्ञतापूर्वक उद्गार काढीत.

आई वारल्यावर मुलांची सर्व काळजी बापावर पडली. आठवे वर्षी बापूंचा विवाहसंबंध झाला. भावे यांच्या कुटुंबांतील कन्या यांनां दिली. विवाहसंबंधीं एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. वरातीची मिरवणूक हत्तीवर निघाली. बापूंनां हत्तीवर बसण्यास भय वाटूं लागलें; ह्मणून त्यांचे वडील त्यांचे मागें बसले. यामुळें खरा नवरामुलगा कोण हें ओळखण्याची लोकांनां मोठी पंचाईत पडली. याप्रमाणें बापूंच्या विवाहाचा वृत्तांत आहे. लग्न झाल्यापासून सात वर्षांनीं बापूंचे वडील पित्ताची विकृति होऊन आजारी पडले. अनेक प्रकारचे उपायांची योजना केली; परंतु ते त्यांतून बरे होण्याचीं चिन्हें मुळींच दिसलीं नाहींत. दिवसेंदिवस रोग बळावत चालला, आणि त्याच रोगानें शेवटीं त्यांस माघमासीं महाशिवरात्रीचे दिवशीं ते स्वतः महारुद्र एकादशणी शंकरावर करीत बसले असतां देवाज्ञा झाली. मरतेसमयीं आबांनीं आपल्या थोरल्या चिरंजीवास बापूंची रात्रंदिवस काळजी घेण्यास सांगितलें. "बापू अद्याप लहान आहे; अजून त्याचा खोड्या करण्याचा स्वभाव गेला नाहीं; तो कोणाचें ऐकणार नाहीं; करितां तूं त्याला जपत जा. ज्याप्रमाणें आजपर्यंत मी त्याला ममतेनें वाढविलें, त्याप्रमाणें तूं त्यास प्रेमानें वागवून त्याचे कल्याणाविषयीं दक्ष असत जा, एवढेंच काय तें माझें तुला सांगणें आहे." अशा प्रकारें थोरल्या

मुलाला शेवटचे दोन शब्द सांगितल्यावर आबांचें प्राणोत्क्रमण झालें.

**बाबा** हे मोठे सुशील, सद्गुणी, सौम्य, मर्यादशील, दयाळु आणि विनयवान् असे होते. ल्हानपणापासूनच परमार्थाकडे यांचें लक्ष फार असे. ते मोठे कर्मनिष्ठ असत. ते आपला सर्व वेळ **ईश्वराचे** भजनपूजनादि कर्मे करण्यांतच घालवीत, आणि त्यांनीं आपलें आयुष्यहि पण ईश्वरसेवेंतच घालविलें. वेदांतादि विषयांच्या विचारानें त्यांच्या स्वभावांत विलक्षण प्रकारची शांति दिसून येत असे. त्यांची प्रकृति अगदीं निरोगी असे. ते नेहमीं कडू लिंबाचे पाल्याचा गोळा करून खात असत. असो; वडिलांनीं जी अंतकालीं केलेली आज्ञा ती कधींहि न विसरतां **बाबांनीं** आपले धाकटे भावाचें संगोपन उत्तम प्रकारें केलें. समयविशेषीं आपले स्वतःचे मुलांविषयीं त्यांचेकडून हयगय होई, पण **बापूंनां** ते कधींहि विसंबले नाहींत.

याप्रमाणें पितृसौख्योपभोग **बापूंनां** फार दिवस न मिळतां आपल्या ज्येष्ठबंधूंस पित्यासमान मानून राहणें प्राप्त झालें. या वेळीं **बापूंचें** वय सुमारें पंधरा वर्षांचें होतें. **बापूंनां** नेहमीं **संस्कृत** वाचण्याचा नाद असे आणि त्यांच्या बुद्धीचा कलहि त्याप्रमाणेंच होता. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें बारावे वर्षीं गृहस्थास योग्य असा शिक्षणक्रम संपल्यानंतर त्यांनीं गीर्वाण भाषेच्या अध्ययनास सुरुवात केली. **शिवबाबापू** ह्मणून कोणी मोठे व्युत्पन्न शास्त्री येथें राहत असत.

त्यांचे जवळ बापूंनीं पहिल्यानें व्युत्पत्तीचा अभ्यास केला. आपल्या बुद्धिकुशाग्रतेनें त्यांनीं शास्त्रीबोवांची प्रीति संपादन केली. नंतर **पांडुरंगशास्त्री हरडीकर** यांचे जवळ त्यांनीं **व्याकरणशास्त्र** ह्मटलें, आणि पुढें **गणेशशास्त्री मराठे** यांचेजवळ ते **न्यायशास्त्र** शिकले. इतकी ज्ञानसामुग्री जमविल्यावर त्यांनीं **वैद्यशास्त्रास** हात घातला. **बापूंनां** वैद्यक शिकण्याची आवश्यकता वाटण्यास एक कारण झालें. आमच्या मातोश्री* प्रथम प्रसवसमयीं पितृगृहींच प्रसूत झाल्या. प्रसूत झाल्यावर कांहीं दिवसांनीं त्यांनां मोठें दुखणें आलें. वैद्याचे औषधोपचार चालू होते. वैद्याला घरीं आणण्याकरितां **बापू** स्वतः जात असत. एके दिवशीं **वैद्यमहाराज** प्रकृति पहावयास नित्यक्रमाप्रमाणें आले असतां त्यांनीं बरेच रुपये आगाऊ मागून घेतले आणि आपल्या घरीं गेले. संध्याकाळीं त्यांनीं येण्याचें कबूल केलें होतें. संध्याकाळीं वैद्यमहाराज आले नाहींत, असें पाहून **बापूसाहेब** संतापून त्यांचे घरीं गेले आणि ह्मणाले " अहो **वैद्यबोवा**, पैसे घ्यावयास मात्र तेवढे तुह्मी तयार, मग खेपा घालण्यास कां मागें " ह्या भाषणानें **वैद्यबोवानां** हि बराच राग आला आणि मी येत नाहीं असें त्यांनीं साफ सांगितलें. हें ऐकून **बापूंनीं** उत्तर केलें " **महाराज**, या पुण्यांत थोडेच दिवसांत आपला **धंदा** बसवून

---

*बापू आमच्या मातोश्रीचे सख्खे चुलते.

आपणाला खालीं पहावयास लावीन तरच हा खरा."

दुसरे दिवसापासून बापूंनीं वैद्यशास्त्र शिकण्यास प्रारंभ केला. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या पदरचे पुंडलीकबुवा ह्मणून कोणीएक गृहस्थ येथें राहत असत. त्यांचेपाशीं वैद्यशास्त्रांतील प्रथमतत्वांत मात्र बापूंचा प्रवेश झाला व पुढें बापूंनीं स्वत आपल्या बुद्धीच्या जोरावर वैद्यशास्त्राचें ज्ञान पूर्ण संपादन केलें. ह्या सर्व शिक्षणामध्यें अध्यापकापासून जितकें अल्प साहाय्य लागेल तेवढें घ्यावयाचें आणि बाकी सर्व आपले श्रमानें तयार करावयाचें असा त्यांचा क्रम असे. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व शास्त्रांमध्यें जी प्रवीणता त्यांनीं मिळविली, आणि त्याचा जो त्यांनीं उपयोग केला त्यांतील मुख्य बीज स्वश्रमार्जित स्वाध्यापन हें होय. ह्यांच्या शिक्षणक्रमासंबंधानें ज्या दोनतीन गोष्टी ध्यानांत धरण्यासारख्या आहेत त्यांसंबंधानें येथें दोन शब्द लिहिणें प्रशस्त दिसतें. त्या वेळच्या इतिहासाकडे आपण अवहित चित्तानें जरा अवलोकन केलें तर असें आढळून येईल कीं, पेशवाईचा नुकताच ऱ्हास झाला होता; श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांस त्यांचे दुर्वर्तनाबद्दल ब्रह्मावर्त्तवास करण्यास पाठविलें होतें; इंग्रजी अंमलाचें वारें नुकतेंच लोकांनां लागूं लागलें होतें. इंग्रज बहादरांनीं शांततेचें राज्य स्थापण्यास खटपट चालू केली होती. अशा प्रकारची स्थिति असतां बापूंचा जन्म झाला. पेशवाई अमलांतील प्रभुत्वाचे आणि सत्तेचे

लोकांचे मनावर उमटलेले जे ठसे ते अद्यापि जसेच्या तसेच कायम होते. **राजा** करील तें **प्रमाण** हें तत्त्व लोक विसरले नव्हते. **राजकीय कामामध्यें** राजाची इच्छा जशी प्रबल असे, त्याचप्रमाणें **धर्मसंबंधीं कामांत** आणि **शिक्षण**दानाविषयींहि अनुक्रमें **उपाध्यायाची** व **अध्यापकाची** सत्ता चालत असे या तीन्ही प्रकर्णांत कोणच्याहि गोष्टी संबंधानें सत्यतेविषयीं किंवा असत्यतेविषयीं, न्यायाविषयीं किंवा अन्यायाविषयीं, आपल्या विचारणा शक्तीचें प्रमाण घेण्याचें लोकांनां कधीं स्वप्नींहि ठाऊक नव्हतें.

असे सर्व प्रकारचे संस्कार बापूंच्या मनावर सहज रहावयाला पाहिजे होते. असें असतां बापूंनीं जी आपल्या शिक्षणक्रमामध्यें **विचारशक्तीनें** ताडून पाहिल्याशिवाय कोणतीहि गोष्ट न स्वीकारण्याची पद्धत अनुसरली, ती तत्कालीन स्थितीचे मानानें पाहिलें असतां वर्णन करण्यासारखी होती असें सहज दिसून येईल. सर्वांच्या पद्धतीहून भिन्नपद्धतीची योजना त्यांनीं केल्यानें ते जास्त स्तुतीस पात्र आहेत. **बापूंनां** ज्ञानाची **अभिरुचि** असे. ते जें शिकत तें मोठ्या आवडीनें शिकत. त्यांनीं वैद्यशास्त्राध्ययना संबंधानें कोणाचेंहि सहाय्य घेतलें नाहीं. विषय समजण्यांत ज्या ज्या अडचणी येत त्या ते स्वतःच्या अकलेनें आणि मेहनतीनें दूर करीत. यामुळें त्यांनां स्वतःच्या मानसिक शक्तीचा विश्वास उत्पन्न झाला, आणि विचार करण्याची योग्य दिशा लागली. आपण

जें करूं तें होईल असें त्यांनां सहजी वाटूं लागलें. **स्वतंत्रतेनें** स्वशिक्षणाचा क्रम त्यांनीं अनुसरल्यामुळें आपल्या विद्येंत विलक्षण प्रवीणता मिळविणें त्यांनां सुलभ झालें. कोणीकडे स्वश्रमार्जित ज्ञान मनुष्याचे **बुद्धिपराक्रम, आनंद, सौख्य, यश** आणि त्यामुळें नैसर्गिक दिसणारी चेहेऱ्यावरील **हुशारी**, आणि कोणीकडे दुसऱ्यावर अवलंबून रहाणाऱ्या **पोपटविद्या** विशारद मनुष्याची **उद्विग्नता, खिन्नता,** आणि **रडकेपणा** ! कोठें पहिल्याप्रकारच्या **मनुष्याची ज्ञानप्रियता** आणि कोठें दुसऱ्या प्रकारचे गृहस्थांची **ज्ञानारुचि** ! परंतु दुर्दैवानें प्रस्तुतची विद्वान् मंडळी वर निर्दिष्ट केलेल्या दुसऱ्या प्रकारचीच असतात. स्वाधीन **स्वशिक्षणा**शिवाय **स्वावलंबन** येत नाहीं. त्यावांचून मोठमोठे **तत्ववेत्ते, शास्त्रज्ञ कवि** निपजत नाहींत. दुसऱ्यानें **दिलेली शिदोरी** किती दिवस पुरेल? ज्ञान हें **उसनें** घेऊन कांहीं उपयोग नाहीं, तर तें बुद्धीचा **भाग** बनलें पाहिजे. जशीं कळसूत्रीं बाहुलीं **हलवावीं** तोंपर्यंत हलतात, त्याप्रमाणें हल्लींच्या शिकलेल्या लोकांची स्थिती दिसून येते. ज्ञान हें नुसतें संपादन करूनच त्याचा उपयोग होत नाहीं तर तें पचलें पाहिजे आणि सावकाश **मुरून** त्याची नीट **घटना** झाली पाहिजे. जसजशी बुद्धि स्वभावतः **विकास पावेल**, तसतसा ज्ञानाचा पुरवठा झाला पाहिजे. कोणताहि त्रास न होतां सुखावह होईल तेंच ज्ञान ग्रहण करावें.

ज्ञान संपादनाच्या क्रमांत नेहमीं प्रथम **शुद्ध** नंतर **मिश्रित**, प्रथम **अविविक्त** मग **विविक्त**; प्रथम **अनियत** नंतर **नियत**, प्रथम **प्रयोग** नंतर **उपपत्ति** प्रथम **कला** नंतर **शास्त्र**, प्रथम **विशिष्ट** नंतर **अविशिष्ट**, प्रथम **तत्व** नंतर **नियम**, अशा प्रकारची व्यवस्था असावी कारण सृष्टतः मन अशा रीतीनेंच विकास पावत असतें. अशा तऱ्हेनें गेलें असतां ज्ञानाचा कंटाळा कधीं येत नाहीं. **पदवी** मिळाल्याबरोबर पुस्तकें कोणी **फेंकून** देत नाहीं. प्रस्तुत शिक्षण पद्धतींत अशी सुधारणा होईल तो सुदिन. तोंपर्यंत उतावीळ होऊन मात्र कांहीं फायदा नाहीं.

असो. बापूंनीं वैद्यशास्त्राचा अभ्यास सतत अकरा वर्षे केला. ह्या वेळीं त्यांचें वय सुमारें तीस बत्तीस वर्षांचें होतें. येवढ्या वयांतच त्यांनीं चार शास्त्रांवर स्वामित्व संपादिलें. **व्याकरण, व्युत्पत्ति, न्याय**, आणि **आयुर्विद्या** हीं सर्व त्यांच्यामध्यें कशीं जागृत असत. बापू वीस वर्षेपर्यंत विक्षिप्तासारखे वागत. ते नेहमीं लंगोटी घालून फिरत. कोणाशीं बोलणें जसें काय वर्ज्य असे. एकटे सदा तिसऱ्या मजल्यावर जाऊन ते बसत. परंतु त्यांनीं आपल्या विद्येची कधीं कोणत्याही प्रकारें हयगय केली नाहीं. वैद्यशास्त्र पूर्ण झाल्यावर औषधींचा अनुभव पाहण्याकरितां ते औषधें तयार करून आजारी लोकांना देऊं लागले. रोगाची नीट परीक्षा करून लवकर गुण येईल अशा औषधांची ते योजना करीत असल्या

मुळें लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली. लोकांचें संख्या दररोज वाढत चालली. एक दोन रोगी अत्यावस्थ असतांना बापूंचें औषध घेतल्यापासून थोड्या वेळांत त्यांना गुण दृष्टीस पडला. ह्या कारणानें बापू हे उत्तम वैद्य आहेत अशी त्यांची एकदम प्रसिद्धि झाली. त्यांनीं वैद्यक्रियेस सुरवात केल्यापासून सुमारें सात आठ वर्षेंपर्यंत औषधें फुकट देण्याचा क्रम ठेविला होता. असे त्या वेळीं त्यांनीं शेंकडों लोकांवर उपकार केले. वैद्यक्रिया चालली असतां ते दुसऱ्या एका गहन विषयामध्यें व्याप्त होते. वेदांतमीमांसेमध्यें प्रवेश करून त्यांनीं त्या विषयाचें अध्ययन करण्यास प्रारंभ केला होता. दोन तीन वर्षें त्या विषयाचें ज्ञान प्राप्त होण्यास अव्याहत श्रम करून त्यांत त्यांनीं नैपुण्य मिळविलें. अशा प्रकारें त्यांचा ज्ञानप्राप्तीचा क्रम पूर्ण झाला.

तेव्हां त्यांचे वयास सुमारें चाळीसावें वर्ष लागलें होतें. यावेळेच्या सुमारास त्यांची गृहस्थिती काय होती हें सांगणें अवश्य दिसतें. बापूंचा संसार नीट थाटला होता. यावेळेपर्यंत चार मुलगे व तीन मुली असा त्यांचे कुटुंबाचा विस्तार झाला होता. लग्न करण्याच्या मुख्य हेतूकडे लक्ष दिलें असतां त्यांचेकडून तो हेतु पूर्ण सिद्धीस गेला होता. लग्न करण्याचें मूल बीज काय असा जर आपल्याशीं कोणी विचार करील तर त्यास असें कळून येईल कीं लग्न हें केवळ कामोपभोग वासना तृप्त करण्याकरितां-

च कोणी करीत नाहीं. कारण, असें असतें तर काम वासना अन्य तऱ्हेनें तृप्त करण्याकरितां इतर पुष्कळ साधनें लोकांना योजितां आलीं असतीं. पण वस्तुस्थिती ह्याहून भिन्न आहे. एकाच स्त्रीशीं लग्नसंबंध करून तो धर्मप्रणीत आहे असें समजून, तिच्याशिवाय अन्य स्त्रीशीं समागम करण्याविषयीं जो प्रतिबंध तो पाळण्याविषयीं, सर्व जनांमध्यें इच्छा दिसून येते. ह्यावरून उघड आहे कीं विवाहसंबंधाचा मुख्य हेतू प्रजोत्पादन होय. आपण परलोकवासी झाल्यावर आपल्या मागे आपला आत्मा संतती रूपानें ह्या जगामध्यें रहावा ही इच्छा सर्वत्र सबळ असते आणि ती तशी असणे इष्ट आहे. कारण ती तशी जर नसती तर मनुष्य जातीच्या सुधारणेला मोठाच प्रत्यवाय आला असता. मनुष्य आणि पशू ह्यांच्यामधील जो भेद तो नाहींसा झाला असता. अशा गोष्टींचा विचार केला ह्मणजे बापू हे जगाच्या ऋणांतून मुक्त झाले होते असें ह्मणणें योग्य आहे, तथापि त्यांच्या दृष्टीनें त्यांचें लग्न त्यांनां सुखावह झालें नाहीं. परंतु येथें येवढेंच सांगून ठेवणें रास्त आहे कीं त्यांनीं पुढें जो अन्य संबंध जुळवून आणला त्याच्या कारणांपैकीं वरील गोष्ट एक कारण होय. बापूंनीं स्वतःच गाण्याचा अभ्यास केला होता त्यांनां गाण्याची माहिती चांगली असे. त्यांनां सतारहि वाजवितां येत असे.

पस्तिसावे वर्षीं बापू पहिल्यानें काशीस गेले. त्यावेळीं उत्तरहिंदुस्थानांतून फिरत फिरत येत असतां

**बापूसाहेबांची** स्वारी एका गायनकलाभिज्ञ वारांगनेचे गुण पाहून अतिशय तल्लीन झाली. रसिकजनांनां गुण कोठेंहि जरी **दृष्टीस पडला** तरी ते इतर गोष्टीकडे लक्ष न देतां गुण **ग्रहण मात्र** करीतात. **बापूसाहे-बांनीं** तेथें आपली गानश्रवणेच्छा **यथेष्ट** पूर्ण करून घेतली. यामुळें त्याच्या गानकलाज्ञानाला पुष्कळ भर पडली आणि त्यांनां गाणें ऐकण्याचा फार नाद लागला. येतां येतां स्वारी **श्रीमंत शिंदेसरकारच्या लष्करांतून** आली. **शिंदेसरकार बापू** तेथें येऊन दाखल झाले तों कोठें अन्यस्थलीं होते. **सरकारची** स्वारी दुसरे दिवशीं लष्करांत परत यायची होती. **बापूसाहेबांची** आणि **सरकारची** एकदां भेट व्हावी असा **दरबारांतील** मंडळीचा **मानस** होता. त्याप्र-**माणें** त्यांनीं **बापूसाहेबास** एक दिवस तेथें राहण्याची **सवड** करण्यास आग्रहपूर्वक विनंती केली.

परंतु "**निस्पृहस्यतृणंजगत्**" ह्मणतात तें खरें. नि-स्पृह लोकांनां रावापासून रंकापर्यंत सर्व सारखे. **बापूंनीं** उत्तर केलें कीं मी कांहीं येथें दक्षणा मागण्याकरितां आलों नाहीं. **सरकार** जर प्रस्तुत येथें असते तर त्यांची भेट घेण्याचा माझाहि फार मनोदय होता, पण ते नाहींत त्याअर्थीं मी नियमित वेळापेक्षां येथें जास्त मुक्काम करणार नाहीं. असें उत्तर ऐकून मंत्रीमंडळींनां **बापूंच्या** निस्पृहतेचें आणि सरळ भाष-णाचें फार आश्चर्य वाटलें. नंतर त्यांनीं असा विचार केला कीं, **बापूसाहेब** तर **सरकारस्वारी** येईपर्यंत

राहत नाहींतच. तर सरकारच्या राज्यांतून येवढा मोठा विद्वान गृहस्थ त्यांचें कांहीं आदरातिथ्य केल्याशिवाय जाऊं देणें योग्य होणार नाहीं. कारितां कांहीं तरीं संभावना करून त्यांची बोळवण करावी.

असा विचार ठरल्यावर त्यांनीं बापूसाहेबांकडे एक उंची शालजोडी आणि एक उंची पागोटें अशा दोन वस्तु नजर ह्मणून पाठविल्या. आणि त्या स्वीकारण्याविषयीं विनंति केली. बापूसाहेबांचे मनास ती विनंति मान्य करणें आलें, आणि त्यांनीं त्या नजरेचा आदरयुक्त व आभारपूर्वक स्वीकार केला.

लष्करांतून जें त्यांनीं प्रयाण केलें ते दुसरे कोठें न जातां स्वारी येथें येऊन दाखल झाली. येथें आल्यावर कांहीं दिवसांनीं कांहीं कारणानें बापूंचें डोकें बिघडलें. डोकें बरें होण्यास इतर औषधांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं असें त्यांनीं स्वतःच्या प्रकृतीची परीक्षा करून ठरविलें. पुढें गायन श्रवणाशिवाय आपलें डोकें सुधारणार नाहीं असा त्यांचा पूर्ण निश्चय झाला, आणि निश्चितोपाय योजनेचीं साधनें ते शोधूं लागले. अल्पकाळांतच गाणें ऐकावयास मिळेल अशी त्यांनीं व्यवस्था केली.

प्रति दिवशीं मिश्रानायकीणीचें गाणें ऐकण्याचा त्यांनीं क्रम ठेविला. व ह्यानंतर कांहीं दिवस अंबू बडोदकरीण ह्मणून कोणी गाणारीण वारांगना येथें होती तिचें गाणें त्यांनीं ऐकिलें. बापूंची गायनकला ज्ञानांतहि विशारदता होती. ह्याची साक्ष देणारी

एक गोष्ट आहे ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मिश्रा नायकिणीनें एकदां बापूंनां फसविण्याकरितां शुद्धचा एक कठीण राग ह्मणण्यास प्रारंभ केला. बापूंच्या रसिक कर्णांना तें ऐकणें गोड लागेना. त्यांनीं एकदम तिला असें सांगितलें कीं, मिश्रा, तूं ह्या रागांत स्वर संकर केलास. हें ऐकून बापूंच्या बहु ग्रह बुद्धीचें मिश्रास आश्चर्य वाटलें. आणि तिनें त्यांची फार तारीफ केली. ह्यावरून हें स्पष्ट आहे कीं, बापू जें ज्ञान संपादण्याचा एकदां हेतु धरीत त्यांत ते निश्चयानें निपुणता मिळवीत. बापूंचा कुटुंबनिवास संपण्याचे दिवस आतां अगदीं सन्निध येऊन पोंहोंचले होते. आपला कनिष्ट बंधु नित्य घरीं गाणारणी आणून गाणें ऐकत बसतो ही गोष्ट पुराणरीति रिवाज, आचार विचार, धर्मव्यवहार, याना सन्मान देणाऱ्या बाबांना योग्य वाटेना. आपल्या घरीं वारांगनांचा प्रवेश झाला असतां आपल्या घरास अपवित्रता येईल, आपला नांवलौकिक बुडेल, आणि सर्वांनीं अनुकरण करावें असा जो आपला आचार तो दूषित होईल अशी बाबांना भीति वाटली. तेव्हां बंधूस दोन गोष्टी सांगाव्या, आणि त्याला थोडा उपदेश करावा असा बाबांनीं विचार केला. एक दिवस सकाळीं बाबांनीं बापूंस जवळ बोलाविलें आणि सांगितलें "बापू" तुह्मी आतां अज्ञान नाहीं, परंतु हल्लींच्या तुमच्या क्रमावरून तुह्मी आपला नावलौकिक विसरलासे वाटतें. तेव्हां आमची इच्छा येवढीच आहे कीं तुह्मी आतां

जाणते झालां आहां, करितां सर्व संसार आटपा; आह्मी काशीस निघून जातो. किंवा प्रस्तुत आरंभिलेला क्रम सोडा; आपल्या विद्येचा लोकांनां फुकट उपयोग होऊंद्या; कोणापासूनहि द्रव्य घेऊं नका; उपकार करा. बापूंनां हें सर्व कळत होतें. बाबा जें ह्मणतात तें अनुचित नाहीं,—अशी त्यांची पूर्ण खात्री झाली होती. आपण जर आपला क्रम जसाचा तसा चालू ठेवला तर, वडील बंधु काशीस जाऊं ह्मणतात आणि शिवाय त्यांची आज्ञा उल्लंघन होते. आपला नाद तर सोडतां येत नाहीं असें त्यांचे मनानें घेतलें होतें. तेव्हां त्यांनीं निराळीच युक्ति योजिली. आपणच घरांतून निघून जावें हें प्रशस्त असें त्यांनीं ठरविलें.

बापू आजपर्यंत बाबांच्या मर्जीप्रमाणें वागले होते. पण ह्या वेळीं त्यांची मर्जी कोणत्याहि रीतीनें पाळतां येईना. असें पाहून त्यांनीं गृहस्त्याग करण्यास्तव ज्येष्ट बंधूंचा निरोप घेतला. जातेसमयीं आपल्या पत्नीस व मुलांनां बरोबर नेण्याचें योजिल्याप्रमाणें त्यांनीं त्यांनां विचारलें. पण तशी गोष्ट जमून आली नाहीं. त्या वेळीं कुटुंबांतील मुख्य पुरुषाच्या धोरणाप्रमाणें सर्व सुकाणू फिरावयाचें असें असे. घरांत दुसरे कोणास कोणतीहि गोष्ट स्वतंत्रपणें करतां येत नसे. त्याप्रमाणें बाबाच्या विचाराशिवाय मुलांमाणसांनां बापूंचे बरोबर जातां आलें नाहीं. तेव्हां अर्थातच बापूंनां एकटें घराबाहेर पडणें भाग झालें.

बापूंच्या ह्या कृतिबद्दल दोन शब्द येथें लिहिल्यावांचून पुढें जाणें योग्य होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. बापूंच्या ह्या वर्तनाबद्दल आम्हीं त्यांनां दोष देण्यास तयार नाहीं येवढेंच नव्हे तर त्यांचा पक्षसमर्थन करण्यास आम्हीं सिद्ध आहों. वरील प्रकारच्या प्रसंगीं ते ज्या रीतीनें वागले त्या रीतीशिवाय अन्य तऱ्हेनें वागून सर्वांच्या मर्जीबाहेर न जाणें कसें शक्य नव्हतें हें थोडक्यांत दासविण्याचा आम्हीं यत्न करतों, आपल्या प्रकृतीकरितां गाणें ऐकणें हाच काय तो उपाय असें बापूंच्या विचारें ठरलें होतें हें पूर्वींच सांगितलें आहे. तेव्हां गाणें ऐकण्याची सोय जो मार्ग अनुसरला असतां नाहींशी होईल तो मार्ग अनुसरणें ह्मणजे स्वप्रकृतिस्वास्थ्यपरांङ्मुख होणें. तेव्हां त्या मार्गाची योजना करणें इष्ट नव्हतें हें स्पष्ट आहे. बरें, वरीच गान श्रवणाचा क्रम सुरू ठेवला तर आपल्या नांवलौकिकास दूषण लागतें अशी त्यांच्या ज्येष्ठ बंधूची समज होती आणि तशा समजुतीला मान देणें हें बापूंच्या मतानेंहि न्याय्य होतें. ज्या बंधूशीं इतके दिवस आपण नम्रतेनें वागलों, ज्यांनीं आपलें पुत्राप्रमाणें पालन केलें, ज्यांची आपण नेहमीं आज्ञा पाळिली, त्या बंधूंच्या कृतीस आपल्याकडून कोणच्याहि तऱ्हेनें दोष येऊं नये आणि त्यांचें मन मोडूं नये हेंहि पण युक्त होतें. ह्यावरून बंधूंनां काशीस जाऊं देण्यापेक्षां आपणच घराबाहेर पडावें; ह्मणजे कोणाचीहि गैरसोय होणार नाहीं. असा जो बापूंनीं विचार

केला तो सर्वथा न्याय्य आणि यथार्थ होता असें कोणी हि सुजाण मनुष्य कबूल करील.

त्यांचे जाण्यानें त्यांच्या कुटुंबाचें कोणत्याहि प्रकारें नुकसान झालें नाहीं. हें थोड्या विचाराअंतीं कळून येईल. बापू हे जगाच्या ऋणांतून मुक्त झाले होते हें सांगितल्याचें वाचकांनां स्मरत असेलच. चार मुलेंबाळें झाल्यावर सर्वसंग परित्याग करून सन्यास घेण्यास किंवा इतर तऱ्हेनें आयुष्य क्रमण्यास धर्मशास्त्राप्रमाणें मोकळीक आहे. ह्यावरून धर्मशास्त्राप्रमाणें देखील बापूंचें वर्तन गर्ह्य होत नाहीं. असो. बापू घराचे बाहेर एका धोतरानिशीं पडले ते त्या दिवशीं होलकर आळींत रावजी लेले यांचे वाड्यांत रहावयास गेले. त्या दिवशीं त्यांना सारा दिवस उपासच पडला. शेवटीं रात्रीं त्यांचे परम मित्र राजमान्य राजश्री भाऊ गोडबोले हे त्यांनां बापू निघाल्याची गोष्ट समजतांच, बापूंकडे विचारपूस करण्यास आले. रा. गोडबोले आले तों बापूसाहेब स्वस्थ आनंदांत बसले आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

ज्यांच्याजवळ ज्ञानशस्त्र पाजळून तयार असतें त्यांची स्थिति अशीच असावयाची. रा. गोडबोलेकरांनां बापूंनीं सर्व दिवस उपास काढल्याचें वृत्त समजतांच त्यांनीं आपले घरून फराळाचें ताट आणाविण्याची तावडतोब व्यवस्था केली.

बापूंनीं पहिल्यानें त्याचा अव्हेर केला. परंतु "आपण कांहींतरी सेवन केलेंच पाहिजे. मीहि

आपल्याबरोबर फराळास बसतों. आपण उभयतां कांहीं दोन नाहीं असें समजा." अशा प्रकारच्या भाषणांनीं त्यांनीं आग्रह केल्यावर बापूंनीं त्यांच्याबरोबर फराळ केला. पुढें निजण्यास बिछानाहि आपल्याच घरचा आणवून गोईत्रीकरांनीं बापूंची सोय केली. आपणहि त्या दिवशीं तेथेंच निजले.

घर ज्या दिवशीं सोडिलें त्यादिवशीं अशाप्रकारच्या सत्कारयुक्त आदरातिथ्याची बापूंनां फार किंमत वाटली हें उपकाराचें कृत्य बापू जन्मभर स्मरत. बापूंनीं गोईत्रीकरांचा नेहमीं चांगला समाचार घ्यावा. त्यांच्याशीं ह्यांनीं परकाभाव कधींहि ठेविला नाहीं. बापूंनीं ज्यादिवशीं गृहनिवास त्याग केला, त्यादिवसाचा वृत्तांन्त असा मनोवेधक आहे. दुसऱ्या दिवसापासून बापूंच्या नवीन आयुष्यक्रमास सुरुवात झाली.

# उत्तरार्ध.

पूर्वींचा संसार गेला तर पुनः नवीन संसार थाटण्याचें त्यांनीं योजिलें. द्रव्योपार्जनास्तव स्वसंपादित ज्ञानाचा उपयोग ते त्याच दिवसापासून करूं लागले. ह्यांचें एक नूतन **राज्यच** संस्थापित झालें. रोगरूपी शत्रूंच्या तडाक्यांत सांपडलेले, रुग्णरूपी जे आपले प्रजाजन, त्यांची मुक्तता करण्याकरितां आयुर्विद्या शस्त्राची त्यांनीं योजना केली, आणि कीर्तिरूपी राज्याची संस्था करण्यास त्याच वेळापासून प्रारंभ झाला. प्रजाजनांकडून ज्या राजानें आपली मुक्तता केली, त्यास **पूज्यबुद्धि** आणि **प्रेम** अशा रूपानें करभार देण्यांत येऊं लागले.

अशा प्रकारच्या विस्तीर्ण राज्याची स्थापना झाल्यावर, बापूंनां स्वपराक्रमोपभोग घेण्यास सांपडूं लागले. राज्य संस्थापना होऊन कांहीं दिवस झाल्यावर, **राज्यश्रीस** शोभा देणारी अशी **स्त्री** बापूंनीं अंगिकारिली. हा एकप्रकारचा त्यांनीं **प्रीतिविवाहच** केला असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. **सहधर्मिणीप्रमाणें** बापूंचा तिच्याशीं संबंध असे, व तिचेंहि वर्तन बापूंशीं प्रेमयुक्त असे. परस्परांनां एकमेकांचा समागम अत्यंत सुखोत्पादक झाला.

हा जो नवा संबंध जमून आला, याविषयीं कित्येक बापूसाहेबांनां दोष देतील आणि दोष देणें अल्पांशीं यथार्थहि आहे. परंतु आतांपर्यंतच्या त्यांच्या वृत्तांताकडे बारीक दृष्टीनें अवलोकन केलें म्हणजे या दोष देण्यांत पोकळपणाचा भाग अधिक आहे असें सहज ध्यानांत येईल. दोष देण्यांत मुख्य बीज काय याचा आपण विचार करूं लागलों असतां आपणास असें आढळून येईल कीं, बापूंचें हें कृत्य अनीतिकारक झालें असा बहुतांचा समज झाला; आणि वरवर पाहणाराला तें अनीतिचें कृत्य सहज वाटेल यांत कांहीं नवल नाहीं.

वर्तन अनितीचें किंवा नितीचें ह्मणण्यापूर्वी नीति आणि अनीति ह्मणजे काय? आणि नीतीनें कां वागावें? अशा प्रश्नांचा प्रथमतः विचार केला पाहिजे. जें वर्तन व्यक्तीस किंवा समाजास हितावह असेल तें नीतीचें वर्तन; जें वर्तन व्यक्तीस किंवा समाजास अहितकारक असेल तें अनीतीचें वर्तन होय. आपणास किंवा समाजास कोणत्याहि प्रकारें उपद्रव न होतां आपणास व समाजास, सौख्य व्हावें हा नीतीनें वागण्याचा मुख्य उद्देश. आतां या हेतूला धरूनच किंवा या हेतूपासून दूर, बापूसाहेबांचें आचरण झालें कीं काय? या प्रश्नाचा उलगडा केला ह्मणजे, बापू हे नीतीनें किंवा अनीतीनें आचरिले हें दृष्टीस येईल. बापूंनीं घरीं राहण्याचा मार्ग जर पतकरिला असतां तर त्यांनां बंधूंच्या उपदेशाप्रमाणें वागणें प्राप्त होतें.

बंधूंच्या उपदेशाप्रमाणें वागणें ह्मणजे, औषधें फुकट देऊन उपकार करणें हें होय.

तेव्हां अशा करण्यापासून द्रव्यप्राप्ती कांहीं झाली नसती हें उघड आहे. बापूंनीं घरीं राहून औषधें फुकट देणें, किंवा बाहेर राहून औषधांचा उपयोग द्रव्योपार्जन करण्याकडे करणें या दोन्ही गोष्टी द्रव्याच्या फायद्या संबंधानें विचार करितां त्यांचे कुटुंबास सारख्याच होत्या असें झालें. ममता, लोभ, दया, अशा बंधनांपासून होणाऱ्या सौख्याकडे लक्ष दिलें असतां कुटुंबाचें थोडेंबहुत नुकसान झालें असें ह्मणणें भाग आहे. या दोन्हीं गोष्टींनीं बापूंचें मात्र अहित झालें असें नाहीं. तर उलट कुटुंबाव्यतिरिक्त पांच, चार, माणसांस त्यांनां सधन करून सोडण्यास सांपडलें. असें जें आपण बापूंच्या आचाराचें निरुपण केलें त्यावरून हें सिद्ध आहे कीं त्यांचें वर्तन जरी सर्वथा न्याय्य आणि नितीवत् नव्हतें तरी त्यांत अनितीचा अंश फारच थोडा होता. बापूंनीं पुढें आपल्या मुलांमाणसांचा चांगला समाचार घेतला नाहीं येवढ्याबद्दल कोणीहि न्यायी मनुष्य त्यांनां दोषास्पद ठरवील. असो.

आतां आपण बापूंच्या नवीन सुरू झालेल्या आयुष्यक्रमाकडे वळूं. ह्याच वेळीं त्यांनां एक प्रकारच्या नवीन सौख्याचें वारें लागूं लागलें होतें. नूतन कृत समागमाची त्यांनां विलक्षण मनोरमता भासूं लागली होती. गृहसंबंधीं सर्व बंधनें नाहींशीं झाल्यामुळें

आपण जणुं काय पिंजऱ्यांतून सुटलों असें त्यांनां वाटूं लागलें होतें. नानाविध मनोविकारांवर सतत चालत आलेलें जें गुरूजनांचें नियंत्रण तें शिथिल झाल्यामुळें स्वातंत्र्यानें त्यांचे मनावर आपला पूर्ण अम्मल बसविला. ह्याच वेळीं स्वातंत्र्याचें आणि लहरी स्वभावाचें बीजारोपण होऊन त्यापासून झालेल्या वृक्षाचीं बळकट मुळें इतकीं खोल गेलीं होतीं कीं त्यांच्या लहरी स्वतंत्रतेच्या कल्पनांस जरा धक्का लागला कीं त्यांचे मनांत उत्शृंखल रागाचा प्रादुर्भाव व्हावा. जितक्या मानानें स्वगृहीं बापू उग्रनियम विधीनें वागले तितक्या मानानें त्यांच्या प्रस्तुत वर्तनांत अनवस्थित क्रम सुरू झाला. क्रिया जेवढ्या जोरानें होईल तेवढ्या जोरानें प्रतिक्रिया होते ह्या सृष्टिनियमाची आठवण केली ह्मणजे त्यांचें वर्तन बरेच अंशीं दोषमुक्त होतें. बापूंचा स्वभाव मूळचाच तब्बेती असे, आणि ह्या स्थितींत तर त्या तब्बेतखोरपणास अधिकच भर पडली. हा जो त्यांचा स्वभाव बनला तो सर्व आयुष्यभर जशाचा तसाच होता.

ज्याकरितां बापूंची स्तुति करावयाची, ज्याकरितां त्यांचे उपकार झाले असें मानावयाचें, ज्याकरितां त्यांचें स्मारक करावयाचें, ज्या योगानें त्यांनीं आपलें व शेंकडों लोकांचें हित केलें, त्या गुणांचा विकास ह्याच समयापासून होऊं लागला. सर्व आयुष्यांत वर्तमानकाळीं प्रारब्ध झालेला आयुष्यक्रमच उज्वल होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

बापू लोकांपासून औषधाची किंमत घेऊं लागले. रोग्यांनां लक्षपूर्वक पाहून, रोगाची नीट परीक्षा करून ते उपचारांची योग्य योजना करीत. ह्यामुळें त्यांचेकडे आलेला रोगी हटकून बरा होत असे. हळूहळूं वैद्यराज या नात्यानें जशी बापूंची कीर्ति पसरत चालली तशी लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली. काशीरामेश्वरापर्यंत सर्व देशभर बापूंच्या यशाचा प्रतिध्वनि दुणाणूं लागला. जणु काय एक धन्वंतरी स्वर्गलोकाहून ह्या भूतलावर अवतरले आहेत असें सर्वत्र वाटूं लागलें. बापूंच्या यशाचा प्रसाद घेण्याकरितां शेंकडों कोसांवरून आलेले रोग्यांचे थवेच्याथवे त्यांच्या येथें जमत. बापूंचे औषधाचे दर फार माफक असल्यामुळें गरिबगुरिबांनां त्यांचेपासून मोठा उपयोग होत असे.

तथापि असे कित्येक रोगी येत असत कीं त्यांनां औषधाकरितां कवडीहि देण्याचें सामर्थ्य नसे. अशा लोकांनीं बापूंच्या हातापायां पडावें, दीनमुद्रेनें त्यांच्या विनवण्या कराव्या आणि तुह्मी आमचे मायबाप आहांत असें ह्मणून त्या महात्म्याचे हृदयास द्रव आणावा. इतक्या तऱ्हेचे जे गरीब लोक बापूंकडे येत त्यांनां ते केवळ परोपकारबुद्धीनें बरे करीत. असे कित्येक लोक बरे झाल्यावर बापूंनां दुवा देऊन जात. बापूंच्या घरीं जी मंडळी येत त्यांत कोणी श्रीमंत असोत, किंवा गरीब असोत, सर्वांनां ज्यांच्या त्यांच्या अनुक्रमानें बहुधा औषधें देण्यांत येत असत. जे रोगी

बरे होण्याच्या स्थितींत असत त्यांनांच बापू हातीं धरीत आणि औषधोपचार करण्यास सुरुवात करीत.

दुखणें असाध्य व अनावर आहे अशी परीक्षा करून त्यांची खात्री झाली कीं, मजजवळ औषध देण्यासारखें नाहीं, दुसऱ्या कोणा वैद्याचे उपाय करा, असें रोग्यास ते स्पष्ट सांगत. उगीच एखाद्यास आशा लावून त्याला आपल्या नादीं केवळ पैसे उपटण्याकरितां ते कधींहि कोणास गुंतवून ठेवीत नसत. वैद्यशक्तीच्या आहारांत जे जे रोग असत ते ते कितीहि भयंकर असले तरीं त्यांचें उन्मूलन करण्यास बापूंचा हातखंडा असे. वैद्यशास्त्रनियोजित मर्यादेच्या बाहेर रोग्यांची स्थिति झाली असतां ते त्यांस बरें करण्याचें पतकरीत नसत.

विशेष स्मरणीय गोष्ट अशी आहे कीं बापूंनीं जो रोग असाध्य ह्मणून ठरवावा त्यारोगाचें उपशमन होऊन अन्य वैद्याच्या उपायानें प्रकृति स्वास्थ्य होणें **बहुधा अशक्य** असे.

**बापूंच्या** दवाखान्यांत औषधें देण्याची रीति इतर दवाखान्यांतील रीतीहून भिन्न असे. रोग्याचा हात पाहून रोगाचा उद्भव होण्यास काय काय कारणें झालीं असतील तीं त्यांनीं **स्वतः** सांगावीं, आणि रोग्यास आपल्या अनुभवानें तीं खरीं आहेत किंवा नाहींत, असें विचारावें. आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट ही कीं त्यांनीं केलेली परीक्षा आणि रोग्याचा अनुभव यामध्यें नेहमीं खात्रीनें अनुगुण्य असावयाचेंच.

अशा प्रकारची चिकित्सा झाल्या नंतर रोगावर नेमकीं औषधें देण्याची योजना होई, अशा कारणानें आजारी मनुष्य लवकर बरे होण्याचें कठीण जात नसे.

बापूंच्या चिकित्सा करण्यांत येवढा विशेषकीं समयविशेषीं रोग्यास आपला अनुभव स्वतः सांगतां जरी न आला तरी बापूंनीं केलेल्या परीक्षेशीं आपला अनुभव जुळवून पहाण्याचें काम अडाणी मनुष्यहि करूं शके. यामुळें रोग चिकित्सा बरोबर होत असे. बापूंचें औषध घेतलें असतां पथ्य फारच माफक करावें लागे.

परीक्षेची फी घेण्याचा प्रथमतः बापूंचा परिपाठ नसे. परंतु त्यांनां जेव्हां असें आढळून आलें कीं, कितीएक लोक आपल्याकडून रोगाची बरोबर परीक्षा करून घेऊन औषध घेण्यास मात्र दुसऱ्याकडे जातात, तेव्हां त्यांनीं हात पहाण्यास्तव एक रुपया फी बसविली. रोग्याच्या घरीं जाण्याची बापूंची वहिवाट नसे. मग तो रोगी **सधन** असो किंवा **निर्धन** असो तथापि रोग्याचे घरीं जाऊन त्याला पहाणें हें अत्यावश्यक आणि अधिक हिताचें आहे असें जेव्हां त्यांनां वाटे तेव्हां ते त्याच्या घरीं जाण्याचें कधींहि नाकारित नसत. घरीं जाण्याबद्दल अमूक एक फी अशी बापूंनीं कधींच ठरविली नव्हती. रोगी जें काय आपल्या इच्छेनें देईल त्याचा ते स्वीकार करीत. एखाद्यास कांहीं देण्याचें सामर्थ्य नसल्यास ते त्याजपासून कांहीं घेत नसत. वर हात पहाण्याकरितां

एक रुपया फी घेत असत ह्मणून सांगितलें, तो रुपया रोग्यानें औषध घेतल्यास औषधाच्या आकारांत वजा होत असे.

कितीएक लोक आजारी मनुष्य अगदीं मरणोन्मुख झालें ह्मणजे बापूंनां घरीं नेण्याची सुरवात करीत. बापू केवळ त्यांच्या मर्जीस्तव जात असत. असा रोगी जर मरण पावला,—जें त्यांनां माहित असेच—तर त्याज पासून ते कांहींही घेत नसत. मग मिळणारी फी एक रुपया असो अथवा हजार रुपये असो. मेलेल्या माणसाबद्दल कांहीं एक घ्यावयाचें नाहीं, हा जो त्यांचा अलौकिक गुण त्यागुणाचे मंडणार्थ येथें एक उदाहरण देणें अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें. मुंबई शहरीं कल्याणजी शिवजी या नांवांचे एक प्रख्यात गृहस्थ असत. त्यांच्या मरण समयापूर्वीं कल्याण शिवजीच्या गृहीणीनें एकदां परीक्षा करून जाण्या करितां बापूंनां आग्रह पूर्वक निमंत्रण केलें. प्रथमतः बापूंनीं जाण्याचें नाकारलें. परंतु पुन्हां आग्रह पूर्वक विनंत्या झाल्यावर न जाणें म्हणजे अशा मोठ्या गृहस्थाचा अनादर करणें होय, असें बापूंनां वाटून त्यांनीं मुंबईस जाण्याचे मनांत आणिलें.

मुंबईस गेल्यावर ज्या वेळीं बापूसाहेबांची स्वारी कल्याणशिवजींचे बंगल्यावर चिकित्सा करण्याकरितां गेली, त्या वेळीं तेथें दुसरेहि कांहीं आयुर्विद्याविशारद नामांकित डाक्टर हजर होते.

इतर चिकित्सकांनीं परीक्षा करून असें ठरविलें कीं, कल्याणजीच्या व्याधीचा यदाकदाचित् जरी त्या दुखण्यानें शेवट झाला, तथापि तशी गोष्ट घडण्यास बराच अवधि लागेल; करितां भिण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यांनीं त्यांचे कुटुंबास सांगितलें.

कल्याणजीच्या बायकोनें खरीखुरी स्थिति काय आहे असा बापूंस प्रश्न केला, कारण तिला सर्व मालमत्तेची व्यवस्था आपले पतिसमक्ष करणें होती. बापूंनीं परीक्षा करून तिला स्पष्ट सांगितलें कीं, बाई, तूं शहाणी असशील तर निरर्थक डाक्टरांनां पैसे न भरतां आपली काय ती व्यवस्था सत्वर कर. कल्याणजी दोन तीन प्रहरांचा आतां काय तो सोबती आहे.

बाईनें बापूंच्या बोलण्यावर विश्वास ठेवून सर्व व्यवस्था केली. बापूंनीं निदान केल्याप्रमाणें आपले पतीचा अंत झाला हें पाहून बापूंच्या शक्तीचें तिला आश्चर्य वाटलें. तिनें आपल्या नवऱ्याच्या हातांतील पांच हजार रुपयांची आंगठी बापूंनां बक्षीस केली, पण तिचा त्यांनीं स्वीकार केला नाहीं, येवढेंच नव्हे, तर जातांयेतांचें भाडें देखील त्यांनीं तिजपासून घेतलें नाहीं. पांच हजार रुपये ह्मणजे लहानसहान रकम नव्हे; परंतु न्यायानें पैसा मिळविण्याविषयीं केवढा हा बापूंचा दृढनिश्चय! अन्यायानें, द्रव्यप्राप्ति करून घेण्यासंबंधानें केवढा हा त्यांनां जबर तिटकारा! अशीं निस्पृह आणि निर्लोभी मनुष्यरत्नें फार

थोडीं सांपडतात, आणि त्यांतून वैद्य मंडळींत तर फारच थोडीं.

बापूंनां पैशाची तमा नसे. असो. बापूंची वैद्य या नात्यानें जी ख्याति झाली त्यांतील मुख्य बीज असें आहे कीं, त्यांची परीक्षा बरोबर असे; ते निदान बिनचूक करीत; आणि एकदां त्यांनीं हातीं धरलेला रोगी ते हटकून बरा करीत. ह्या ज्या बापूंच्या वैद्य क्रियेच्या स्वाभाविक रूपदर्शक तीन गोष्टी त्या येथें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविणें अवश्य व महत्वाचें आहे. करितां येथें दहापांच उदाहरणें देण्याचा आमचा विचार आहे.

एके समयीं आमचे वडील बंधु कोजागिरीचे दिवशीं आपल्या मित्रमंडळींत खेळत बसले असतां खेळण्याचे नादांत मागील जिन्यास कठडा नाहीं हें त्यांचे लक्षांत न राहिल्यामुळें मागें टेंकावयास गेले तों मागच्या मागें जिन्याच्या पायऱ्यांवरून गडबडत खालीं पडले. जिन्याच्या पायथ्याशींच जातें होतें त्याजवर त्यांचें आंग आपटून जरासें चेंचलें, आणि ते अम्मळ बेशुद्ध झाले.

हें सर्व पाहून मित्रमंडळींनीं त्यांचे डोळ्यास जरा पाणी लाविलें, तों ते सावध होऊन त्यांनां पुन्हा खेळण्यास बसण्यापुरती हुशारीहि पण आली. घरांतील माणसें रागें भरतील ह्मणून त्यांनीं ही गोष्ट घरांत कोणासहि कळविली नाहीं. आणि दुसरे दिवशीं पडल्याचा परिणाम शरीरास जाणवला नाहीं, ह्या कार-

णानें कळविण्याची त्यांनां जरूर[illegible] वाटली नाहीं. असे सुमारें पंधरा दिवस गेले. पुढें एक दोन दिवसांनीं ह्मणजे ऐन दिवाळींत त्यांचें आंग एकाएकीं ठणकायास लागून ते कांहीं वेळानें जरा बरें वाटेल ह्मणून निजले. निजल्यानंतर ताप अतिशय भरला. घरांतील माणसें त्यांस उठविण्यास गेलीं तों ते बेशुद्ध होऊन त्यांची दातखिळी बसली आहे आणि डोळे पांढरे झाले आहेत असें माणसांच्या दृष्टीस पडलें.

घरांतील सर्व माणसें घाबरून गेलीं. मुलाला एकाएकीं असें कशानें झालें हें त्यांनां कांहींच कळेना. तथापि त्यांनीं घरगुती औषधें देण्यास सुरुवात केली. डोळ्यामध्यें जीं जीं कोणी सांगितलीं तीं तीं अंजनें घातलीं. पण कांहींएक उपयोग झाला नाहीं. अर्थांतच कारण माहित नाहीं तेव्हां औषधापासून काय फायदा होणार!

शेवटीं बापूसाहेब यांना येण्याकरितां बोलावणें पाठविलें. बापूसाहेब त्या वेळीं मेहेरबानी करून आले. त्यांनीं प्रकृति पाहिली आणि हा मुलगा जगणें कठीण असें त्यांनां वाटलें. आमच्या वडिलांनीं बरें होणें साध्य आहे कीं असाध्य आहे असें बापूसाहेबांनां खोदूनखोदून विचारिलें. बरें होणें कठीण असें बापूंनीं स्पष्ट सांगितलें. हें निदान ऐकून सर्व माणसांच्या तोंडचें पाणी पळालें. परंतु बापूसाहेब घरीं जावयास निघालेले पुनः माडीवर परत आले. आणि पंधरावीस दिवसांपूर्वीं एखाद्या उंच जागेवरून हा मुलगा पडला

होता कीं काय अशी त्यांनीं विचारपुस केली. घरांत हें कोणासहि माहीत नव्हतें असें पूर्वींच सांगितलें आहे शेवटीं आमच्या बंधूंच्या मित्रमंडळीकडे तपास करितां ते जिन्यावरून पडल्याची गोष्ट समजली ती बापूंना कळविली. तेव्हां आतां मी याला खात्रीनें बरा करतों असें सांगून बापू निघून गेले. पुढें त्यांचेच औषधोपचारानें आमचे बंधूस गुण आला. ह्या हकीकतीवरून बापूंचें कार्यकारणभाव ज्ञान किती बरोबर असे याची चांगली कल्पना येईल.

दुसरें उदाहरण,—सुमारें बारा वर्षांपूर्वीं पुणें येथें **कामीसरीएट जनरलचे हुद्यावर** असणारे साहेबास कांहीं निमित्तानें सरकारांतून दोष देण्यांत आला. साहेब मनाचे फार हळू असल्यामुळें त्यांचें हृदयास दोषरूपी बाण बरेच टोंचले.

झालेल्या अप्रतिष्ठेचा त्यांचे मनास बराच धक्का बसल्याकारणानें त्यांची मान आंवळल्यासारखी होऊन त्यांचे घशांत एक प्रकारचा रोग झाला. त्यामुळें त्यांनां खाण्यापिण्याची आणि बोलण्याची बरीच अडचण पडूं लागली.

साहेबांनीं मोठमोठ्या विद्वान डाक्तरांकडून आपल्या रोगाची परीक्षा करविली. साहेब हे एक महिन्याचे आंत मरण पावतील असा सर्व डाक्तरांचा अभिप्राय पडला. साहेब यांची प्रिय कन्या आणि तिचे तरुण पतिराज अशीं दोन माणसें या समयास विलायतेंत होतीं. आपण तर मरणारच पण आप-

त्या लाडक्या मुलीची आणि जामातांची एकदांतरी भेट व्हावी अशी साहेबांची आणि त्यांच्या मडमेची उत्कटेच्छा होती. परंतु एक महिन्याचे अवकाशांत ही गोष्ट कशी घडून येणार! अशा विवंचनेंत रात्रंदिवस तीं नवराबायको पडलीं. बरे करण्यासंबंधानें डाक्टर लोकांनीं तर हात टेकले. तेव्हां पुढें आतां काय इलाज करावा या विषयीं मडमेस मोठी काळजी लागली.

शेवटीं आपल्या नौकर माणसांपाशीं तपास करितां तिला असें समजलें कीं पुण्यांत बापू साहेब मेहेंदळे ह्मणून एक प्रसिद्ध वैद्य नेटिवांत आहेत. तेव्हां अशा वैद्यराजाकडे जाऊन आपल्या प्रियपतीच्या रोगाची चिकित्सा एकवार करून घ्यावी असें तिनें योजिलें. दुसरे दिवशीं मडमसाहेबांची गाडी बापूंच्या द्वारापाशीं येऊन थडकली. आपलें सर्ववृत्त तिनें बापूंस निवेदन केलें, आणि कांहीं चांगले उपाय योजण्याविषयीं तिनें त्यांची हात जोडून विनंती केली.

"मी काय वेडा भटभाई. आमचे उपचार तुह्मां साहेब लोकांस कसे पसंत पडतील. तेव्हां तुह्मीं कोणा इंग्रजी डाक्टराकडेस जा." असें बापूंनीं उत्तर केलें. परंतु त्या मडमेनें फार गयावाया केल्यावर आणि नानाप्रकारें त्यांच्या विनवण्या झाल्यावर तिच्या नवऱ्याची प्रकृति पाहून एकदां परीक्षा करण्याचें बापूंनीं पत्करिलें. संध्याकाळीं बापूंनीं साहेबांचे बंगल्यावर जावें असें ठरलें. संध्याकाळ होतांच

मडमेचीगाडी आली आणि बापूंची स्वारी बंगल्यावर निघून गेली.

परीक्षा झाल्यावर बापूंनीं मडमेस सांगितलें कीं तुझा नवरा तर मरणार खास पण मी त्याला एक महिन्याच्या ऐवजीं सहा महिनेपर्यंत वांचवून तुमची आणि तुमच्या मुलीची व ज्यामाताची भेट होईपर्यंत साहेब खातरीनें मरत नाहींत अशी मी हामी घेतों. मात्र सांगतों तें औषध तयार झालें पाहिजे.

बापूंनीं जें औषध तयार करण्यास सांगितलें तें असें. बकऱ्याची एकाच घावास मुंडी तोडून ती टांगून ठेवावी, आणि खडीसाखरेचा पाक करून त्यांत बापूंनीं दिलेली पुडी घालून तो पाक त्या मुंडीखालीं ठेवावा, आणि त्यांतून जो अर्क पडेल तो त्या पाकांत मिश्र करावा अशाप्रकारें तयार झालेलें औषध साहेबास सहा महिने घेण्यास त्यांनीं सांगितलें. इतक्या मुदतींत विलायतेहून साहेबांची लाडकी मुलगी आणि तिचे यजमान पुण्यास येऊन दाखल झाले. त्यांची व ह्या उभयतां नवराबायकोची भेट होऊन एकदोन महिने त्यांनां येथें राहवयासहि पण सांपडलें.

आपल्या मुलीची आणि आपली भेट घडवून आणण्याकरितां परमदयाळू ईश्वरानें बापूंच्या रुपानें जणुंकाय देवदूत पाठविला असें त्यांनां वाटून साहेब आणि मडम उभयतां खरोखर नाचूं बागडूं लागलीं. जणुंकाय आपल्याला सहा महिनें अधिक आयुष्यच मिळालें असें वाटून साहेबास विलक्षण प्रकारचा आ-

नंद झाला. त्या दंपत्यानें आपला आनंद बापूसाहेब यांनां नानातऱ्हेनें प्रदर्शित केला आणि त्यांचे फार आभार मानिले.

बापूंनीं सांगितल्याप्रमाणें साहेबांची स्वारी सहाव्या महिन्यांतच निजधामास गेली. साहेबांच्या मडमेला बापूंच्या बुद्धिमत्तेचें आणि चिकित्सा सूक्ष्मतेचें फार नवल वाटलें. विलायतेस परत जातांना ती बापूंच्या भेटीस गेली आणि उपकारऋण थोडेंबहुत तरी फेडण्याकरितां तिनें बापूंच्या पुढें एक हजार रुपये आणि एक मूल्यवान् शाल ठेविली.

परंतु ज्या अर्थी तिचा नवरा मेला होता त्या अर्थी तिच्यापासून त्यांनीं एक पै देखील घेतली नाहीं. साहेबांनीं मरणसमयापूर्वीं बापूंच्या अद्वितीय शक्तिमत्तेचें एक प्रमाण पत्र लिहून ठेविलें होतें तेंहि बापूंनीं घेतलें नाहीं. बापूंनीं येवढा आपल्यावर उपकार केला तेव्हां त्यांनी आपल्या देणगीचा स्वीकार करावा असें मडम साहेबांच्या मनांत फार होतें पण बापूसाहेब कांहींच घेत नाहींत असें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां त्यांचा मोठा हिरमोड झाला आणि त्यांनां फार वाईट वाटलें. शेवटीं "आह्मांवर तमचे अनंत उपकार आहेत त्यांचे आह्मी उतराई कसे होऊं" अशा प्रकारचे उद्गार मडमेनें, भाषणांत आणि नानाविध अभिनय करून स्पष्ट करून दाखविले आणि बापूंची रजा घेतली.

ह्या गोष्टीवरून बापूसाहेबांचें सामर्थ्य, औदार्य,

निस्पृहता, न्यायेच्छा हे गुण कसे ढळढळीत प्रकाशूं लागतात.

उदाहरण तिसरें.—ऑरडिनँन्स आफीसमधील एका इंग्रजी कामदाराच्या बायकोच्या पोटांत कांहीं रोग झाला. रोगाची परीक्षा करण्याकरितां पुष्कळ युरोपियन डॉक्टर जमा केले होते, त्यांत बापूसाहेबांनांहि नेले होते. परीक्षाविधि समाप्त झाल्यावर डाक्टरांच्या आणि बापूसाहेबांच्या मनांत भेद पडला. पोटांत हरणिया* नांवाचा रोग झाला आहे असें बापूंच्या अभिप्रायें ठरलें. हा हरणिया रोग नव्हे असें डाक्टर मंडळींचें मत पडलें. पोट फाडवून आपलें ह्मणणें सिद्ध करून दाखवावें अशी बापूंची इच्छा होती. परंतु मतभेदामुळें ती गोष्ट तशीच त्या वेळीं वादावर पडली.

पुढें साहेब पत्नीसह इंग्लंडास निघून गेले. तेथें गेल्यावर तेथील डाक्टरांकडून तिचें पोट फाडविलें, तों हरणिया रोगच आहे असें त्यांनां कळून आलें.

बापूसाहेबांनींहि अशाच प्रकारची परीक्षा केली होती हें साहेब बहादुरांच्या लक्षांत होतें. बापूंनां त्यांच्या परीक्षाज्ञानाकरितां, साहेबांनीं दोनशे रुपये विलायतेहून पाठविले होते. परंतु बापूंनीं कांहीं घेतलें नाहीं.

---

*ज्याला इंग्रजीत हरनिया ह्मणतात. रोगाच्या नांवाविषयीं आमची पूर्ण खात्री नाहीं.

उदाहरण चवथें.—पुण्यांतील माडीवाले यांचे चिरंजीव सुंदरलाल हे बरेच आजारी असतां परीक्षेसाठीं **डा० विटी, डा० विश्राम** आणि **वैद्यराज बापूसाहेब** असे तिघांनां नेले होते. परीक्षा करून डा० **विटी** आणि डा० **विश्राम** हे उभयतां एकमेकांच्या सल्यानें उपचारपत्रक लिहावयास लागले. **बापूंनीं** डा० **विश्रामजी**स जरा बाजूस बोलावून सांगितलें कीं दादा, तुह्मीं यादी कसची लिहितां? तो पोरगा चार तासांचे आंत खातरीनें मरेल. डा० **विश्रामजीस** आणि डा० **विटीस** हें ह्मणणें सम्मत होईना. सांगण्यास आश्चर्य वाटतें कीं **बापूंनीं** निदान केल्याप्रमाणें तो मुलगा चार तासांतच मेला.

असें विनचूक निदान करण्याबद्दल **डाक्टरद्वयानें बापूसाहेबांची** फार प्रशंसा केली, आणि ह्या वेळेपासून **डा० विटीचा बापूंवर** लोभ बसला, आणि **डा० विश्रामजीचा बापूंशीं** स्नेहभाव सुरू झाला. **डा० विटी** पुढें **बापूसाहेबांस** कित्येकदां आपल्याबरोबर रोगचिकित्सा करण्याकारितां नेत असत.

उदाहरण पांचवें—बाहेर गांवची कोणीएक वाणीण तिचें पोट अवाढव्य मोठें झाल्यामुळें येथें आली होती. पुष्कळ वैद्यांकडे व डाक्टरांकडे ती फिरली. तुला उदर झाला आहे असें बहुतेकांनीं तिला परीक्षा करून सांगितलें. शेवटीं ती **बापूसाहेबां**कडे आली. तिची परीक्षा करण्यास **बापूंनां** तीन चार तास लागले. पुढच्या भागावर व पाठीमागच्या भागावर टिचकी

मारून पहातां दोन्ही बाजूस बारीक अवाज आला. येवढ्यावरून बापूंनीं बाईस सांगितलें कीं तुला उदर वगैरे कांहींएक रोग नाहीं. तुझ्या पोटांत दोन मुलें आहेत. एकाचें तोंड पुढच्या बाजूस आहे, आणि दुसऱ्याचें तोंड मागच्या बाजूस आहे. कांहीं दिवसांनीं बाई बाळंतीण झाली तों तशीच स्थिति आढळून आली.

उदाहरण सहावें-तोंडावरून परीक्षा. पुण्यांतील एका प्रसिद्ध घराण्यांतील एक बाई,* प्रकृति बरीच अस्वस्थ वाटल्यामुळें, कांहीं औषध घ्यावें ह्या हेतूनें बापूसाहेबांकडे आल्या. कोणी मोठ्यांच्या बायका आल्यास त्यांनीं मध्यघरांत बसावें असा बापूंच्या येथें शिरस्ता असे. त्याप्रमाणें त्या बाई मध्यघरांत शिरतांना बापूंनीं सहज त्यांच्याकडे पाहिलें. बाहेर ओटीवर बरीच मंडळी बसली होती त्याच्या समक्ष बापूंनीं आरडून त्यांनां सांगितलें, "बाई तुमच्या रोगाची परीक्षा मी केली आहे. ज्या पुरुषावर तुमचें मन बसलें आहे त्या पुरुषाशीं तुह्मीं समागम करा ह्मणजे प्रकृति नीट होईल."

बसलेल्या मंडळींनां हें ऐकून बरेंच आश्चर्य वाटलें पुढें जिज्ञासेनें शोध करितां असें समजून आलें कीं त्या बाईची आपल्या मोतद्दारावर प्रीति बसली

---

*ह्या बाईचें नांव व घराणें आह्मांस माहित आहे परंतु आह्मी त्याचा स्फोट करूं इच्छीत नाहीं.

होती. कांहीं कारणानें त्या मोतद्दारास घालवून दिल्यापासून बाईची प्रकृति बिघडली होती; आणि ह्यास्तव त्या औषध घेण्याकरितां आल्या होत्या. परंतु वैद्य पडले **विलक्षण** ! त्यांनीं पहातांक्षणींच बाईचा खरा आजार काय होता हें सांगितलें.

उदाहरण सातवें—सुमारें बारा पंधरा वर्षांपूर्वीं श्रीमंत **बापूसाहेब निंबाळकर** यांची प्रकृति बिघडून दिवसेंदिवस क्षीण होत चालली. मोठमोठ्या विद्वान् वैद्यांचे व डाक्टरांचे औषधोपचार श्रीमंतांनीं चालू ठेविले होते, परंतु त्यापासून त्यांना रेसभरहि गुण आला नाहीं. **बापूसाहेब गर्हेदळे** यांची कीर्ति कर्णोपकर्णीं श्रीमंतांचे कानावर गेली होती, तेव्हां ह्या वैद्यवर्याच्या हातून एकदां शेवटला उपाय करून पहावा असें त्यांच्या मनांत आलें.

त्यांचे पदरीं रा• विठ्ठलपंत टिळक या नांवाचे एक गृहस्थ होते. ह्या गृहस्थांचा आणि आमच्या **वडिलांचा** बराच स्नेह असे आणि **बापूसाहेबांचा** आमचे **वडिलावर** बराच लोभ असे. तेव्हां त्यांचे मार्फत **बापूसाहेबांकडे** जाण्याकरितां **निंबाळकरांची** स्वारी आपल्या लव्याजम्यासह येथें येऊन दाखल झाली.

प्रकृति पहाण्यास **बापूंनां** बोलावणें पाठविलें तों अशा **श्रीमंत** लोकांची **तब्बेत** आमच्यानें संभाळवणार नाहीं असें ह्मणून प्रथमतः**श्रीमंत निंबाळकरांची** प्रकृति पहाण्याचें **बापूंनीं** नाकारिलें. **निंबाळकरांनीं बापूंनीं** यावें ह्मणून एक हजार रुपये देऊं केले. त्यांस तु-

ळशीबागेंत जाऊन आपले रुपये दान करा असें उत्तर बापूंकडून मिळालें. पुढें तीर्थरूपांनीं बापूंची आग्रहपूर्वक विनवणी करून त्यांचेकडून निंबाळकरांची प्रकृति पाहण्याचें कबूल करून घेतलें. बापूसाहेबांची स्वारी निंबाळकरांचे बंगल्यावर गेली. भेट वगैरे झाल्यावर श्रीमंतांची प्रकृति पाहून बापूंनीं निदान केलें, आणि असें सांगितलें कीं आपण पुन्हां विवाहसंबंध करावा किंवा अन्य स्त्रीसमागम करावा. बापूंच्या उपदेशाप्रमाणें श्रीमंतानीं दुसरें लग्न केलें, आणि त्या योगानें त्याची प्रकृति पण सुधारली.

उदाहरण आठवें—श्रीमंत पंतप्रतिनिधी यांनां लीव्हरचा रोग होऊन त्याशिवाय त्यांनां क्षयभावनाहि झाली होती. लीव्हरचा रोग बऱ्याच पक्कदशेस येऊन पोहोंचल्याकारणानें बरें होणें जरासें कठिणच झालें होतें. श्रीमंतांची स्वारी बापूसाहेबांचें औषध घेण्यास्तव येथें आली. बापूंनीं परीक्षा करून औषधोपचार करण्याचें कबूल केलें ह्यामुळें प्रथमतः श्रीमंतांनां बरेंच आश्वासन आलें. श्रीमंत पंतप्रतिनिधीस मुंबईस राहण्याविषयीं बापूंनीं उपदेश केला. त्याप्रमाणें ते मुंबईस जाऊन राहिले. बापूसाहेब प्रत्येक चवथे दिवशीं श्रीमंतांच्या समाचाराकरितां मुंबईस जात असत. ह्याप्रमाणें बरेच दिवस क्रम सतत चालू होता. हळूहळू श्रीमंतांच्या प्रकृतीस आराम वाटूं लागला आणि शेवटीं ते बापूंच्याच उपचारांनीं चांगले सुधारले. आपली बरेच दिवस ऱ्हास

पावत चाललेली जी प्रकृति, तिला बापूंनीं आरोग्य आणिलें हें पाहून श्रीमंतांनां परमानंद झाला; आणि बापूंचे मोठे उपकार वाटले. उघडच आहे आरोग्यसौख्यापेक्षां संसारसुखामध्यें दुसरें बलवत्तर सौख्य तरी कोणतें !

बापूंच्या उपकाराची फेड करण्याकरितां श्रीमंतांनीं बापूंनां हजार रुपये बक्षीस दिले. बापूसाहेबांनींहि ह्या देणगीचा अत्यादरपूर्वक स्वीकार केला. या वेळेपासून श्रीमंतांशीं बापूंचा जो स्नेहभाव सुरूं झाला तो अखेरपर्यंत दृढ राहिला. श्रीमंतांचे थोरले कुटुंबाचें बापूंकडे येणें जाणें व त्यांच्याशीं पत्रव्यवहार ठेवणें या दोन गोष्टी याच वेळेपासून सुरूं झाल्या. आईसाहेबांच्या मोडी अक्षराबद्दल बापू त्यांची फार वाखाणणी करीत. यांच्यासारखी स्वजीवितनाथसेवादक्षतेसंबंधानें काळजीपूर्वक व प्रेमयुक्त तत्पर असणारी अन्य स्त्री फार विरळा. या बाईसाहेब नित्य किन्हईस* रहातात. तथापि स्वपतिदक्षिणपादांगुष्ठपवित्रीकृतजलग्रहण झाल्याशिवाय त्यांचा एक दिवसहि जात नाहीं. बापू हे श्रीमंतांचे राजवैद्यच बनून राहिले होते. प्रतिनिधीसाहेबहि बापूंच्या गुणाचें ग्रहण करून त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांच्याशीं मोठ्या आदरानें वर्तत. या त्यांच्या गुण

---

*औंदापासून किन्हई बारा कोस आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

परीक्षणासंबंधानें चीफसाहेबांची तारीफ केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. बापूंच्या ठायीं त्यांचा फार पूज्यभाव असे. असो.

उदाहरण नववें.—श्रीमंत अप्पासाहेब नातूंना उदराचा रोग झाला होता. रोग वाढत वाढत जाऊन अनावर झाला आहे असें जेव्हां बापूंच्या दृष्टीस आलें तेव्हां त्यांनीं अप्पासाहेबांस असा विचार सांगितला कीं, आपण आतां हा सर्व संसारचा पसारा त्याग करून काशी यात्रेस जाण्याचें करावें. बापूसाहेबांच्या तोंडून जेव्हां असे शब्द आले तेव्हां आपलें मरण निश्चित आहे असें वाटून अप्पासाहेबांचें मन जीवितशंकाकुल होऊन बरेंच खचलें. शेवटीं त्यांनीं काशीस जाण्याचा बेत केला.

काशीस जाऊन पोहोंचेतोंपर्यंत मी जगेन कीं नाहीं, असा अप्पासाहेबांचे मनांत संशय उत्पन्न झाला. बापूसाहेबांनीं त्यांची खात्री केली कीं, आपण काशीस पोहोंचून तीनचार दिवस निश्चयानें लोटतील. आपण कांहीं देखील काळजी करूं नका. असें आश्वासन देऊन बापू अप्पासाहेबांचें बरोबर कल्याणपर्यंत गेले आणि तेथून त्यांचा निरोप घेऊन पुण्यास परतले.

वाचकहो, अप्पासाहेबांची काय स्थिति झाली असली पाहिजे हें आतां मागच्या उदाहरणांवरून तुमच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल. तथापि एकदां आमचे तोंडून ऐकाच. अप्पासाहेब येथून निघाले ते काशीस सुखरूप पोहोंचले. मार्गांत प्रकृतीस जणु काय

आराम पडत आहे असें त्यांनां वाटलें. काशीस पोहों-चल्यावर अप्पासाहेबांचे हातून श्रीभागिर्थीचे स्नान वगैरे विधी ऊरकले. एकदोन दिवस प्रकृतीस गुण आल्यासारखे त्यांनां दिसून आलें.

परंतु बापूसाहेबांचें निदान चुकेल अशी जणु काय ईश्वरास काळजी वाटून अप्पासाहेबांचे या भुलोकीं राहणें समाप्त व्हावें अशी त्यानें योजना केली. काशीस पोहोंचल्यावर बरोबर तीन दिवसांनीं श्रीमंत अप्पासाहेबांचा अंत झाला.

उदाहरण दहावें.—आह्मी एक दिवस बापूंचे येथें बसलों असतां कोणीएक मनुप्य तेथें आला. त्या मनुप्याचें अर्धांग बहुतेक निरुपयोगी झालें होतें. बापूंनीं हें पाहून त्या गृहस्थास प्रश्न केला कीं, "अहो तुम्ही चांदण्यारात्रींत महिना दीड महिना निजला होतां कीं काय? आणि तुम्हांस स्वस्थ झोंप आलीच नाहीं कीं काय?

असा प्रश्न विचारतांच त्या गृहस्थानें बापूं पुढें हात जोडले आणि ह्मणाला कीं महाराज आपण म्हणतां त्याप्रमाणेंच माझी स्थिति झाली आणि मी असा पंगू झालों आहे. पण मला जाग्रणें झालीं ही गोष्ट आ-पणांस कशी कळली? या त्याच्यां धीट प्रश्नांचें बापूसाहेबांनां कौतुकच वाटलें, आणि तेथें असलेल्या सर्व मंडळींनां बापूंची अशी बिनचूक परीक्षा पाहून बरेंच आश्चर्य वाटलें.

ह्या सर्व उदाहरणांत बापूंच्या बुद्धिमत्ता, विद्वत्ता,

दृढानुभव वगैरे गुणांचा प्रकाश कसा झळझळीत पडतो हें स्पष्ट होईल. बापू हे वैद्याग्रणी होते ही गोष्ट आज आम्हीं नवी ठरविणें नलगे. तर या गोष्टीचा शेंकडों लोकांनां अनुभव आला आहे. बापूंच्या चिकित्सासुक्ष्मतेविषयीं प्रशंसक लेख एका वर्तमान पत्रांत सांपडला तो पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

" पुणें.—गेल्या बुधवारीं येथील नारायण पेठेंत रहाणाऱ्या गृहस्थानें आपल्या रोगाची खरी परीक्षा करण्याकरीतां येथील वैद्यांची सभा भरविली होती. त्यावेळीं वेदशास्त्रसंपन्न रा॰ रा॰ बापूसाहेब मेहेंदळे हे गेले होते, त्या प्रसंगीं येथील कांहीं शास्त्रीमंडळी व गृहस्थहि हजर होते, त्यांस बापूसाहेबांची वैद्यकीचे कामांत प्रविणता पाहून मोठें नवल वाटलें व जमलेल्या गृहस्थांनीं त्यांची मोठी वाहवा केली म्हणून समजतें. कि." या सर्व उदाहरणांवरून बापूंची वैद्यक्रियाविशिष्टता पूर्णपणें दिसून येईल असें आह्मांस वाटतें.

अशीं शेंकडों उदाहरणें आणखीं देतां येतील. परंतु स्थलसंकोचास्तव आणि मनोरंजनभंगभीतीनें तीं येथें देत बसण्याचा आमचा विचार नाहीं.

आर्यवैद्यकाचें उत्तम ज्ञान संपादन करून त्याचा यथायोग्य उपयोग केला म्हणजे आर्यवैद्यकाचे सहाय्यानें काय काय पराक्रम करून दाखविण्याची शक्ति येते, ही गोष्ट वर निवेदन केलेल्या सर्व उदाहरणां वरून उत्तम तऱ्हेनें स्पष्ट होते. आर्यवै-

ग्रंकाचें सामर्थ्य, त्याचें बल, त्याची उपयुक्तता, त्याची पूर्णता, त्याचा महिमा इत्यादि सर्व गोष्टींची साक्ष बापूंचे बुद्धिपराक्रम देतील. आर्यवैद्यक निःसत्व आहे असें प्रतिपादन करणाऱ्याचें म्हणणें किती निराधार आहे हेंहि ह्या उदाहरणांवरून व्यक्त होईल आणि बापूंच्या लोकोत्तर बुद्धिविशालतेचें आणि अद्वितीय कल्पनाशक्तीचें तेज सर्वांच्या हृदयान्तांत चांगला उज्वळ उजेड पाडील.

बापूंची अशी प्रतिज्ञा असे कीं, जर कोणी गीर्वाणभाषेंत आणि आर्य वैद्यकांत माझा हात धरील तर त्यास मी साष्टांग प्रणिपात घालून त्याचा शिष्य होऊन राहीन आणि पुनः वैद्यक्रिया करणार नाहीं. काय हा स्वज्ञानदृढतेचा विश्वास! खरोखर ज्ञान संपादन करावें तर असेंच करावें.

बापूंनीं आपलें नांव राखील असा, आर्यवैद्यकाचा लोकांनां उपयोग करून देणारा, आणि त्याचें चांगलें रक्षण करणारा शिष्या तयार केला नाहीं म्हणजे त्यांनीं आपल्या आयुष्याचा दुर्व्यय केला असें कित्येकांचें म्हणणें आहे. आर्यवैद्यकास हात घालण्यापूर्वीं शिकणाराची व्याकरण आणि न्याय ह्या दोन शास्त्रांत चांगली गति चालेल अशी त्याची योग्यता असावी असें बापूंचें मत असे. नुसतें समासचक्र आणि रूपावळि येऊन कांहीं फायदा नाहीं असें ते ह्मणत, आणि म्हणूनच समासचक्ररूपावलिपारंगत जी जी मंडळी त्यांचेकडे वैद्यक शिकण्याच्या हेतूनें येत त्या

त्या मंडळीस शिकविण्याचें त्यांनीं पतकरिलें नाहीं.

त्यांच्या मतानें योग्य असा शिकणारा त्यांनां कोणीच भेटला नाहीं. तेव्हां अर्थातच शिष्या तयार करण्यासंबंधानें बापूंच्याकडून हयगय झाली किंवा उदासीनता दिसून आली असें म्हणून त्यांचेवर दोषारोप करणें वाजवी होणार नाहीं. त्यांतून, व्याकरण आणि न्यायशास्त्रज्ञानविरहित देखील एका गृहस्थास त्यांनीं वैद्यक शिकविण्याचा प्रारंभ केला होता. परंतु त्या गृहस्थांनीं थोडेसें तुटपुंजें ज्ञान प्राप्त होतांच स्वतंत्रतेनें वैद्यक्रिया करण्यास सुरवात केली. ह्या गृहस्थाचें ज्ञान कितपत होतें याचें अनुमान १८७४ च्या सातवे नोव्हेंबरच्या ज्ञानप्रकाशांत आलेल्या पत्र व्यवहारावरून चांगलें करितां येईल. या शिष्यवैद्याच्या पढतमूर्खपणानें कित्येकाचे प्रकृतीस अपाय झाले. आपल्या शिकविण्याचा असा दुष्परिणाम झाला हें पाहून बापूंनां वाईट वाटलें आणि कोणी हुशार व विश्वासुक मनुष्य मिळाल्याशिवाय कोणासहि शिकवायचें नाहीं असा त्यांनीं संकल्प केला.

आपल्या धाकच्या मुलीस* वैद्यक शिकवावें असा त्यांचा हेतु होता आणि त्या हेतूनें त्यांनीं तिला संस्कृत शिकविण्यास आरंभहि केला होता. परंतु दुर्दैवानें सर्व कांहीं जसेच्या तसेंच राहिलें. अस्तु.

लेले यांचे वाड्यांत राहिल्यापासून दोन वर्षांनींच

* द्वितीयसंबंधी स्त्रीपासून झालेली.

बापूंनीं सोव्या ह्मसोबाजवळचें घर रा. विसोबाअण्णा घरमोडे यांजपासून विकत घेतलें, आणि त्याच घरांत त्यांचा सर्व नूतन कुटुंबविस्तार झाला.

बापूंनीं आपलें घर फार मनोवेधक केलें होतें. घरांत शिरतांक्षणींच लहानमोठ्या झाडांचा समावेश केलेला दृष्टीस पडावा. जरा पुढें जावें तों एक सवत्सधेनु बांधलेली दृष्टीस पडावयाची. पायऱ्या चढून ओटीवर जावें तों रमणीय हरिण आपले चंचल नेत्र कावरेबावरे करून इकडे तिकडे पाहूं लागावयाचें. जरा वर नजर फेंकली कीं पोपट, मैना, चंडोल यांनीं आपल्या मंजूळ भाषणांनीं येणारांचें अत्यादरानें जणु काय आगतस्वागतच करायचें. इतकें होऊन पुढें पहावें तों कोंपऱ्यांत **राम राम** ह्मणत घोंगडीवर बसलेली शांत आणि **गंभीर** अशी **वैद्यराजांची** मूर्ति मनावर आपली पूर्ण सत्ता बसविण्यास तयारच.

बापूंचें वसतिस्थान पाहिलें कीं, **ऋषीच्या** आश्रमाची कांहीं कल्पना येत असे. कलकलव्याप्त जगत सोडून बापूंच्या शांतिमय आश्रमांत बसून सदैव शांत्योपभोग घ्यावा असें परकीयांचे मनास वाटावें.

घरांत सर्व ठायीं स्वच्छता ठेवली असल्यामुळें तेथें बसणाऱ्यास मोठा आनंद व्हावा. खरोखर अशा वसतिस्थानाच्या सुखकर अवलोकनानेंच अर्धें आरोग्य प्रकृतीस वाटावयाचें. बापूंना सुंदर पशुपक्षी बाळगण्याची मोठी हौस असे आणि ती त्यांनीं बरेचअंशीं पूर्ण

केली. कित्येक दिवस त्यांनीं ससे पाळिले होते. सुंदर मयुरहि त्यांच्या घरीं असत.

हे मोर त्यांनां जव्हाकर राजे यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाईसाहेब यांजकडून देण्यांत आले होते. ह्या राणीसाहेबांची बापूसाहेबांवर फार श्रद्धा असे. त्या बापूंचा चांगला समाचार घेत. त्यांनां त्या वडिलाप्रमाणें मान देत. बापूसाहेब हेहि त्यांच्या आरोग्याची चांगली काळजी ठेवीत. राणीसाहेब फार दयाळु, सुशील, उदार आणि सद्गुणी आहेत अशी बापूसाहेब त्यांची फार वाखाणणी करीत.

बापूंच्या येथें जी मंडळी जमत त्यांचा ते ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें आदरसत्कार करीत. बापूंच्या वक्तृत्वाचा एकदां का पाण्यासारखा झपाट्यानें ओघ चालला कीं, श्रोतृजनांस तेथून उठूं नये असें वाटावें. सर्व लोकांचे डोळे त्यांच्या चेहऱ्याकडे आकर्शिले जावे.

त्यांचें भाषण फार गोड, मृदु, रसाळ आणि अस्खलीत असे, त्यामुळें ऐकणारांचीं मनें मनोवेधकतेनें कशीं तल्लीन होऊन जात. बापूंच्या भाषणांत अनेक प्रकारचे मासले असत. त्यांचें भाषण श्रवण करून रसिकांनां ज्ञानप्राप्ति होई; मनोरंजक कथा आवडणाऱ्यांस गोष्टी ऐकण्यास मिळत; विनोदप्रियांस विनोद मिळे; बीभत्सेच्छूंस बीभत्साचा नमुना सांपडे; स्पष्ट वक्त्यास स्पष्ट वक्तृत्वानें आनंद होई.

अशा प्रकारचे त्यांच्या भाषणांत भिन्न भिन्न मासले असल्यामुळें सर्वांची करमणूक सहज होई. ते बोलत असतां त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि ज्ञान विशालतेची उज्वल प्रभा भ्राजमती होई. भाषणांत हिंदुस्थानीं दोहरे आणि संस्कृत श्लोक यांचा भरणा फार असे. शास्त्री, पंडित, किंवा वर्तमान पदवी विराजित मंडळीहि जरी त्यांचे येथें आली तरी बापूसाहेबांच्या भाषणांतील जोर कधींहि कमी झाला नाहीं.

बापूंनां संस्कृत फार लीलेनें बोलतां येत असे. परंतु त्यांच्या मर्जीप्रमाणें संस्कृत बोलणारा त्यांनां क्वचितच सांपडे. बापू वे॰ शा॰ सं॰ बंडूनानांनां फार वाखाणीत. बंडूनाना मात्र माझ्या बोलण्यांतील मौज उत्तम समजतात असें बापूंनीं ह्मणावें. बंडूनानांनां बापू आपल्या वडील बंधूप्रमाणें लेखीत. बंडूनानाहि बापूंच्या कलाकलाप्रमाणें वागत. कारण त्यांचा तबेतखोर स्वभाव त्यांनां आज पंचावन वर्षें माहीत होता.

आधुनिक विद्वान्मंडळीविषयीं बापूंचें मत असें असे कीं ज्या ज्ञानापासून त्यांचें हित फार थोडें होतें तें ज्ञान संपादण्यास सरकार त्यांनां लावतें. यांची विद्या शेळीच्या शेपटीसारखी आहे; धड माशा वारावयाला निरूपयोगी, धड पार्श्वे झांकावयालाहि निरूपयोगी, असें ते वारंवार ह्मणत. बापूंच्या ज्या वक्तृत्वाचें वर वर्णन केलें आहे तें वक्तृत्व ते आपल्या गादीवर बसलेले असत तोंपर्यंत चाले. सभाधीटपणा त्यांचे आंगीं नव्हता. सभेंत त्यांची छाप बसत

नसे, अशा प्रकारचे कित्येकांचे आक्षेप आहेत.

आक्षेपकांचें प्रमाण काय तें एवढेंच कीं १८७६ सालीं जी येथें सभा झाली होती त्या सभेंत **बापूंचें** तेज पडलें नाहीं. सभेंत कोणत्या प्रकारची मंडळी होती हें आह्मांस माहित आहे. ही सभा भरविण्याचा उद्देशहि आह्मांस माहित आहे, आणि काय काय गोष्टींसंबंधानें तेथें वादविवाद झाला आणि तो कसा झाला हेंहि आह्मी पूर्ण जाणतों. ही सभा प्रसिद्ध कैलासवासी **सार्वजनिक काका** यांचे मंदिरांत झाली. सभेचा अंतस्थ हेतु मत्सरजन्य होता. एकदां कसेतरी **बापूंनां** सभेंत आणावे आणि त्यांची अप्रतिष्ठा 'येनकेन प्रकरणेन' करावी असा इतर वैद्यमंडळीचा मनोदय. बाह्यहेतु हा कीं वैद्यशास्त्रार्थ करवून उत्तम वैद्य कोण हें ठरविणें. सभेमध्यें गालीप्रदानाशिवाय दुसरा कांहीं वादविवाद झाला नाहीं. प्रथम बापूंच्या उलट पक्षाकडून गालीप्रदानास सुरवात झाली.

वे. शा. सं. **बंडू नाना रानडे** हे या सभेस हजर होते. गालीप्रदानाचा प्रकार पाहून आणि जमलेल्या मंडळींची, **बापूसाहेबांची** अप्रतिष्ठा करण्याची इच्छा त्यांनां न खपून वे० शा० सं० **बंडू नाना** सभा सोडून जावयास उठले. परंतु श्री निवासशेपोनीं त्यांनां आग्रह करून बसविलें. **बापूसाहेबांनां** ही वादविवादाची पद्धति अवलोकन करून अतिशय संताप आला आणि त्या संतापाग्नीच्या ज्वाला दुर्वचनरूपानें

६९

बाहेर पडूं लागल्या. सभेंत मारामारी होण्याचा प्रसंग येतो कीं काय अशी नानांनां भीति पडून त्यांनीं बापूंचा हात धरिला आणि त्यांनां घरीं घेऊन गेले. अशी कायती सभेची खरी हकीकत आह्मांस वे० शा० सं० वंडूनानांकडून कळली. नानांच्या मतें या सर्व कृत्यांत बापूंचा कांहींएक दोष नव्हता.

या सर्व वृत्तान्तावरून आक्षेपकांचे म्हणण्यांत किती पोकळपणा आहे या गोष्टीचा निर्णय करणें आम्हीं आपल्या शिरावर न घेतां वाचकांकडेच सोंपवितों. या सभेंत झालेला जो बापूंचा अपमान तो त्यांनां यत्किंचित्‌हि सहन झाला नाहीं. त्यांचें मन अतिशय दुखावलें आणि ते यासंबंधानें वारंवार संतापयुक्त उद्गार काढीत. आपल्या अमूल्य गुणांची खरी परीक्षा न होतां आपली अशाप्रकारची झालेली अवहेलना पाहून कोणत्या सत्यप्रिय आणि स्वाभिमानी पुरुषास संताप येणार नाहीं ! त्यांतून बापूंचा स्वभावतर अनियंत्रित स्वतंत्रतेंत बनत बनत आलेला होता. तेव्हां त्यांनां लोकांनीं केलेल्या अशा प्रकारच्या अपकाराच्या योगानें किती वाईट वाटावें आणि किती कोप यावा !

"सूर्याच्या तोंडावर जर कोणी मोठ्या वमेंडीनें थुंकलें तर थुंकी उलट थुंकणाराच्याच तोंडावर पडते, येवढें लक्ष्यांत वागवून झालेला सर्व अपमान विसरा; ज्यांनां चतुर्थी पंचमीचा देखील अर्थ बरोबर कळत नाहीं अशा ज्ञानशून्य वैद्यांनां सुखेंनैव भोंकूंद्या," अशा

शब्दांनीं नाना बापूंचें शांतवन करीत. ह्या वेळेपा सून पुण्यग्रामस्थांचे संबंधानें बापूंच्या मनांत आढी बसली ती ते मरे तोंपर्यंत नाहींशी झाली नाहीं. येथील लोकांविषयीं त्यांचे मनांत येवढा द्वेष उत्पन्न झाला कीं पुणेंकर त्यांनां दुष्ट शत्रूप्रमाणें दिसत.

"आज ह्या लोकांनीं माझा जो अपमान केला त्याकडे पुढारी ह्मणविणाऱ्या मंडळींनींहि दुर्लक्ष्य केलें. उद्यां माझी विटंबना ह्याहून अधिक होईल तरी देखील या शहरांत माझी अवहेलनाच होईल. मत्सरानें अप्रतिष्ठा करण्यांत ह्या लोकांनां मोटी मौज वाटते. अपमानापेक्षां मरण देखील बरें. असा माझा विनाकारण अपमान करण्यास जर हे लोक चुकले नाहींत तर माझा कोणी प्राणनाश केला तरी ह्यांनां आनंदच होईल, तेव्हां अशा प्रकारच्या नीच आणि मत्सरी लोकांशीं कोणत्याहि प्रकारचा व्यवहार न ठेवणें हेंच सर्वथैव योग्य आणि सुरक्षित." असे विचार बापूंच्या मनांत वारंवार घोळूं लागले आणि ते शेवटीं त्यांनीं अमलांतहि आणिले. पुण्यपत्तनस्थांनां औषधें देण्याचें, बहुतेक त्यांनीं एकदम बंद केलें. कोणीहि नागरिक जर त्यांच्याकडे गेला तर त्याच्या दृष्टीनेंच त्यांचा संतापोदधि कसा खवळून जाई आणि गालीप्रदान लाटांनीं ते त्याला तीव्र प्रहार करीत.

"माझा कोणी अन्यायानें अपमान केला कीं त्याचा सूड उगवल्याशिवाय माझ्यानें राहवणार नाहीं. मग माझें मन फार दुष्ट होतें; राग आवरण्याची मग

माझ्यांत शक्ति नसते; मला मरणप्राय दुःख होतें." बापूंच्या या उद्गारांवरून त्यांचें मन किती दुखावलें होतें ह्याची थोडी तरी कल्पना करितां येईल. आपल्याला कोणी विष घालण्यासहि मागें पुढें पाहणार नाहीं अशा प्रकारची भीति त्यांचे मनांत उत्पन्न होऊन त्यांनीं कोणाच्या घरीं जेवायास जाणें वर्ज्य केलें होतें.

बापूंची तसबीर किंवा फोटो काढून घ्यावा, अशी कित्येक चिताऱ्यांची आणि फोटोग्राफरांची इच्छा होती. त्यांनीं नानातऱ्हेच्या खटपटी केल्या, परंतु बापूंनीं आपलें वदनसादृश्य कोणासहि काढूं दिलें नाहीं. आपल्या मागें आपल्या तसबिरीची लोक विटंबना करतील; करितां मरणोत्तर आपली प्रतिमा जगांत न ठेवणें हेंच उत्तम असें त्यांचे मनानें घेतलें होतें. शेवटीं एका कुशल चित्रकारानें नजर चुकवून त्यांची प्रतिमा रेखून घेतली आणि नंतर ती त्यानें पूर्ण केली. तथापि, हुबेहुब वदनसदृशता दर्शविण्याचें काम ही तसबिर चांगलें करीत नाहीं. असो. यावरून पुण्यनगरवासी जनांचे विषयीं बापूंचे मनास केवढा तेढा बसला होता हें स्पष्ट होईल.

आणखी असेंहि दिसून येईल कीं, आपल्या अपमानाविषयीं जें लोकांचें औदासिन्य तें विसरून या लोकांनां उपकारदंडानें ताडण करण्यास, इतका मोठेपणा बापूंचेठायीं वास करीत नव्हता. पुणेकरांनांहि बापूंच्या विद्वत्तेची खरी पारख न होऊन त्यांनीं

एवढ्या मोठ्या वैद्यवराची कोणत्या तरी रीतीनें समजूत घालण्याविषयीं परवा बाळगिली नाहीं, हा त्यांचा दोष होता असें कोणीहि सुजाण मनुष्य प्रांजलपणें कबूल करील. बापूसाहेब व नागरिक जन यांची जी परस्परांविषयीं बेपर्वाई तिच्या संबंधानें कोणता पक्ष अधिक अपराधी आहे हें ठरविण्यापुरता सबळ व विश्वासलायक पुरावा आमच्यापुढें नाहीं; कारितां वरील मुद्याविषयीं जेवढें विवेचन आह्मीं केलें त्याहून जास्त करणें विशेष धाडसाचें होईल असें आह्मांस वाटतें, ह्मणून हा मुद्दा तसाच सोडणें वाजवी दिसतें.

बापूंच्या मनांत दांभिक वैद्यांच्या संबंधानें बराच तिरस्कारा उत्पन्न झाला होता. जो उठला त्यानें वैद्यक करण्याचा प्रारंभ करावा, आणि त्यास वैद्यशास्त्राचें नांवगांव देखील माहीत नसावें. ही गोष्ट बापूंच्या मतें अगदीं भयंकर होती. अडाणी वैद्यांच्या हातून शेंकडों जिवांचा नाश होतो ही गोष्ट पुष्कळ लोकांचे अनुभवास आलेली असून त्या गोष्टीचा लोक किंवा सरकार यांतून कोणीहि विचार करीत नाहीं, याचें बापूंस फार आश्चर्य वाटे. मनुष्याचे जिवास धोका येऊं नये ह्मणून अपकारी व विषारी पदार्थ परवाना मिळालेल्या माणसाशिवाय कोणी विकूं नये, अशाविषयीं सरकारचा बंदोबस्त असून, अडाणी वैद्यांचे हातून हजारों प्राणी नाश पावतात या गोष्टीकडे सरकार लक्ष देत नाहीं, याविषयीं बापू सदोदित

कुरकुर करीत. अक्षरशून्य वैद्यांच्या संबंधानें पुढील श्लोकांत यथार्थ वर्णन केलें आहे.

[stamp]

## श्लोक.

**वैद्यराज नमस्तुभ्यं ॥ यमराजसहोदर ॥**
**यमस्तु हरते प्राणान् ॥ भवान् प्राणान् धनानि च ॥**

यावरून दांभिक वैद्यांच्या संबंधानें झालेलें जें बापूंचें मत तें यथार्थ आणि योग्य होतें, असें सहज दिसून येईल. बापूंचें मन जर कोणी अन्यायानें दुखविलें तर त्यास बापू हजारों शिव्या देत. विशेष बीभत्स शब्दांचा ते उपयोग करीत. त्यांच्यांत सहनशीलता मुळींच नव्हती असें ह्मटलें तरी चालेल. हा एक त्यांच्यांत मोठाच दोष होता असें आमच्यानें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. त्यांचा स्वभाव फार दुराग्रही असे. एकदां त्यांनीं कांहीं ह्मटलें—मग तें ह्मणणें खोटें कां असेना—कीं ते कधींहि फिरावयाचें नाहीं. एकदां त्यांचे मनानें जो ग्रह घ्यावा तो कायम रहावयाचा. कोणीहि गृहस्थ—तो गरीब असो वा श्रीमंत असो—एकदां कां बापूंच्या स्वतंत्र वृत्तीआड आला कीं आपलें आणि बापूंचें जन्माचें वांकडें आलें असें त्यानें पूर्ण समजावें. त्यांच्या जो तब्बेतीप्रमाणें वागे त्याची तब्बेत ते संभाळीत; त्यांच्याशीं ज्यांचें सन्मानयुक्त वर्तन असे, त्यांच्याशीं ते संभावितपणानें वागत; त्यांच्याशीं जो खरा त्याच्याशीं ते खरे; त्यांची मर्जी

संभाळली कीं बापूसाहेबांसारखा दुसऱ्याची मर्जी संभाळणारा क्वचितच सांपडेल.

बापू फार रसिक असत. गुणीजनांची त्यांच्या येथें परीक्षा असे. अज्ञान मंडळींचीहि समक्ष पूजा करण्यास ते तयार असत. बापूंनां त्यांची जर कोणी खोटी स्तुति लबाडीनें केली तर मुळींच खपत नसे. त्यांनां आपल्या बुद्धिमत्तेचा आणि ज्ञानबाहुल्याचा मोठा अभिमान असे; परंतु आपल्या गुणवत्तेची परीक्षा करणारा कोणी मार्मिक नाहीं, ह्मणून त्यांनां फार वाईट वाटे. बापूंनां जी गोष्ट येत नसे ती दुसऱ्यापासून नम्रपणानें शिकण्यास त्यांनां मुळींच संकोच वाटत नसे.

वैद्यक्रिया जरी चालली होती तरी दोन प्रहरचा वेळ बापू कांहीं तरी अध्ययन करण्यांत घालवीत. त्यांनां एकदां **ज्ञानेश्वरी** वाचण्याची हौस उत्पन्न झाली, परंतु **ज्ञानेश्वरी**चा ग्रंथ समजण्यांत कित्येक अडचणी लागत आणि कित्येक शंका उत्पन्न होत. ते आपल्या सर्व अडचणी आणि सर्व शंका वे. शा. सं. वंडूनाना यांचेकडून समजून घेत. संस्कृत वाचनांतहि जर कोठें संशय उत्पन्न झाला तर ते नानांशीं संवाद करीत. वैद्यकळेंत बापूंची जशी प्रख्याति असे, तशी **वेदांतमीमांसा** समजण्या संबंधानेंहि त्यांची विशारदता असे. वेदान्तांत **पंचदशी** या नांवाचा एक अति कठिण ग्रंथ आहे. हा ग्रंथ उत्तम रीतीनें समजण्यास आणि समजून देण्यास बापूच योग्य असें कित्येक वेदान्तप्रिय जनांचें मत आहे.

बापूंची स्मरणशक्ति फार दांडगी असे. पंधरा वीस वर्षांपूर्वी एक दोनदां पाहिलेले ग्रंथ बापूंचे तोंडीं कसे जागृत असत! बापूंचें अक्षर फार गोड, कोरें आणि दृष्टीस आनंद देणारें असें असे. त्यांच्याकडून कित्येक लोक कित्ते घालून नेत असत. बापू जनोबाभट्टी आणि बिवलकरी असे दोन्ही वळणांचे कित्ते उत्तम घालीत. बापूंना निरनिराळ्या वळणाचीं उत्तम अक्षरें गोळा करून संग्रहीं ठेवण्याचा फार नाद असे. त्यांचे संग्रहास नाना-फडणीस, सवाईमाधवराव वगैरे मोठमोठ्या प्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषांचीं अक्षरें आहेत. जें कांहीं सुरेख दिसेल त्याचा संग्रह करण्याचा बापूंना मोठा शोक असे. कापडावरील सुरेख चित्रांचा देखील ते संचय करीत. निरनिराळ्या प्रकारचे कित्येक रुद्राक्ष त्यांनीं जमविले आहेत. सुंदर तसबिरा त्यांच्या संग्रहीं पुष्कळ आहेत.

दिवसांतून तासभर वेळ बापू नित्य कांहीं लिहिण्याकडे खर्च करीत, आणि हा त्यांचा नियम कधींहि टळला नाहीं. आपल्या वैद्यशास्त्राच्या सर्व ग्रंथांवर त्यांनीं स्पष्टीकरण करणारीं टिप्पणें लिहून ठेविलीं आहेत. असें करण्यांत ग्रंथ साधारण वाचणाराला कळावे असा त्यांचा हेतु होता. हीं सर्व टिप्पणें सुवाच्य अक्षरांनीं पूर्ण लिहिलीं आहेत. भारत चंपूवर आणि गीते-वरहि त्यांनीं कांहीं टिपा लिहिल्या आहेत. पण यांत त्यांचा हेतु काय असावा हें आम्हांस कळत

नाहीं. ज्ञानेश्वरी सुगम करण्याच्या विच्यारानें त्यांनीं काठिण स्थळीं अर्थाचें स्पष्टीकरण केलें आहे, असें खात्रीलायक आधारावरून समजतें; तथापि ज्ञानेश्वरीसंबंधानें आमची स्वतःची खात्री नाहीं असें स्पष्ट सांगणें इष्ट दिसतें.

आपल्या आवडत्या धंद्याशिवाय बापू दुसरेंहि कांहीं शिकत असत. बापूंनां उर्दू चांगलें बोलतां येत असे. फारशी भाषेचेंही त्यांनां थोडेंबहुत ज्ञान होतें. फारशी त्यांनां चांगलेंसें बोलतां येत नसे. त्यांनीं आपला गाण्याचा आणि सतारीचा अभ्यास वाढविण्याचा क्रम नित्य ठेविलाच होता. अशा प्रकारच्या मानसिक श्रमामध्यें त्यांचा वेळ जात असल्यामुळें ते सदां आनंदांत असत. खिन्नता, औदासिन्य, चिंता हीं बापूंनां कधींच ठाऊक नाहींत. संसारनौकेमध्यें नेहमीं त्यांना अनुकूल सुखकारक वायूच्याच झुळका लागत.

त्यांनीं आपले श्रमपरिहारार्थ आणि सौख्यप्राप्त्यर्थ अशीच मनाप्रमाणें सोय केली होती. सहधर्मिणीव्यतिरिक्त अन्य-स्त्री-समागम करण्यांत बापूंचा किती दोष होता, हें त्यांच्या आचाराचें निरूपण करतांनां आम्हीं स्पष्ट दाखविलेंच आहे. तथापि त्या गोष्टीसंबंधानें पुनः एकवार उपन्यास करणें भाग झालें आहे. कांहीं शामभट लाडु भटांनीं आणि सोनामुखी वैद्यांनीं आतां जरा डोकें वर काढून कुत्सितबुद्धीनें अप्रत्यक्ष रीतीनें असें सुचविलें आहे कीं, चरि-

प्रकारानें या बापूंच्या संबंधाविषयीं स्तब्ध राहूं नये; कारण चरित्रांत वर्णन करण्यासारखा बापूंचा मुख्य गुण काय तो हाच आणि दुसरे वर्णनीय असे गुण त्यांच्यांत मुळींच नव्हते. तेव्हां या वायसांनां खरमरीत उत्तर दिल्याशिवाय पुढें जाणें रास्त होणार नाहीं. हे काकानो, तुम्हीं त्या राजहंसाची अशा कृष्ण साधनांनीं बरोबरी करण्याची जी इच्छा धरिली आहे, ती सर्वथैव नीच आहे असेंच लोक म्हणतील. कोणीकडे **पिंडभक्षक काक** मंडळी आणि कोणीकडे **मौक्तिकास्वादीराजहंसपक्षी ! रासभानें** व्याघ्र चर्म परिधान केलें तरी त्याच्या ओरडण्यावरून तो व्याघ्र नाहीं हें उघडकीस येतें. **वायसानों**, तुम्हीं पूर्ण लक्षांत ठेवा कीं, रात्रीस तोंडावरून पांघरूण घेऊन कोणी बघेल या भितीनें अंधारांतून शौचकूप हुंगत फिरण्यापेक्षां राजरोस एखादी स्त्री ठेऊन तिच्याशीं प्रेमयुक्त शुद्ध समागम करणें हें हजारपट बरें. सूर्याकडे तोंड करून थुंकलें असतां काय परिणाम होतो तो तुमचे मनावर पक्का ठसूं द्या; आणि पुनः असें मत्सर जन्य नीच कर्म करण्यास कधींहि प्रवृत्त होऊं नका.

असो. **बापूसाहेबांनीं** आपले दिवस एखाद्या बादशहाप्रमाणें ऐषआरामांत घालविले ह्यांत कांहीं संशय नाहीं. कोणाची ताबेदारी कधींहि त्यांनां रेसभर देखील माहित नसे. आपल्या स्वेच्छेनें आणि आपल्या स्वातंत्र्यास कोणतीहि गोष्ट आड न येतां

जें होईल तें करावयाचें आणि जें मिळेल तें मिळवावयाचें असा त्यांचा परिपाठ असे. मोठमोठे श्रीमंत लोकांनीं देखील जीं सुखें स्वप्नांतहि अनुभवलीं नसतील तीं तीं त्यांनां आपल्या दैवयोगानें उपभोगण्यास सांपडलीं. मालटाचीं द्राक्षें आणि कलींगडें, नागपूरचे संत्रे, आणि उंची उंची आम्रफळें सेवन केल्यावांचून त्यांचा एक दिवस जात नसे. अन्नापेक्षांहि फळफळ सेवन करण्याची त्यांनां फार आवड असे, आणि ही आवड यथेष्ट तृप्त करण्यास त्यांनां कधींच अडचण पडली नाहीं.

पांच चार वर्षांनीं बापू एकदां उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करण्यास जात असत. काशीस त्यांच्या एकंदर सहा खेपा झाल्या. प्रत्येक खेपेस ते कांहीं तरी नवे शिकून येत. गाण्याची आणि सतारीची विशेष माहिती त्यांनीं उत्तरहिंदुस्थानांतच मिळविली. एका खेपेस येतां येतां त्यांनीं कलकत्त्यास कांहीं दिवस निवास करून फाडलेले मुडदे पाहून शरीरांतील भिन्न भिन्न भागांच्या रचनेचें ज्ञान संपादन करून घेतलें.

पांचव्या खेपेस त्यांनीं प्रथमाश्रमांतील कुटुंबास आणि द्वितीयाश्रमांतील स्त्रीस व मुलीस बरोबर घेऊन काशीयात्रा केली. आणि गया, प्रयाग, वगैरे पुण्यस्थानीं यथासांग दानधर्मादि कृत्यें केलीं. बापू साहेबांची प्रकृति चांगली निरोगी असे. दुखणें बाणें त्यानां बहुधा कधीं ठाऊक नसे: त्यांच्या अंगांत चांगली ताकद असे. अशी त्यांच्या आरो-

ण्याची स्थिति असल्यामुळें त्यांनां आयुष्य सुखावह व उपभोग्य असें झालें. अलीकडे मागील वर्षापासून त्यांची प्रकृति जरा अस्वस्थ असे. तथापि त्यांनीं दाण्डगाईनें प्रकृतीची बरीच अवहेलना केली. यामुळें त्यांचें आरोग्य हळूंहळूं कमी होत चाललें होतें ह्मणून एकदां भागीरथीचें शेवटचें स्नान करून यावें असें त्यांच्या मनांत आलें.

उद्दिष्ट हेतूप्रमाणें बापू साहेबांची स्वारी पौषमासीं **श्री क्षेत्रकाशीस** जाण्यास निघाली. शुद्ध द्वितीयेचे किंवा तृतीयेचे दिवशीं प्रस्थान करण्याचा बेत झाल्याप्रमाणें स्वारी पूण्याचे स्टेशनावर साडेबारा वाजण्याचे सुमारास हजर झाली. पोंहोंचविण्याकरितां त्यांजबरोबर अजमासें पांचपंचवीस मंडळी गेली होती. प्रथम एकटेच जाण्याचा बापूंचा बेत होता, पण स्टेशनावर गेल्यावर त्यांच्या मुलींनीं बरोबर जाण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां मुलींचेंहि जाण्याचें ठरलें.

स्टेशनावरील लहान मोठी कामगार मंडळी बापूसाहेबांची भेट घेण्यास हजर होती. बापू साहेब हे नेटीव्हांमध्यें एक मोठे **हाकीम** आहेत असें **स्टेशनमास्तरांस** समजतांच त्यांनीं मेहरबानीनें बापूसाहेब व त्यांचे बरोबर असणारे मंडळीस एक स्वतंत्र डबा उघडून दिला. याप्रमाणें स्टेशनांवर बापूंची मानमान्यता व आदरातिथ्य झाल्यावर बापूंची स्वारी मुलीसह पुण्याहून साडेबाराचे गाडींत बसून रवाना झाली.

येथून निघाल्यापासून चवथे दिवशीं बापूंची स्वारी

प्रयागास जाऊन पोहोंचली. तेथें एक दोन दिवस मुक्काम केल्यावर ते काशीस निघून गेले. पुढें काशीक्षेत्रीं मात्र त्यांचा मुक्काम बारा पंधरा दिवस होता. वाटेंत त्यांची प्रकृति बरीच बिघडली. त्यांनां मोठा ताप आला तो इतका कीं, आंग अगदीं विस्तवासारखें ऊन होई; आव झाली ती इतकी कीं, पन्नपन्नासदां शौचास जावे लागे. काशींत थंडीनें त्यांचे बरेच हाल झाले. बापूंच्या बरोबर उपयोगीं पडणारीं कांहीं औषधें होतीं. परंतु ते ज्या ठिकाणीं उतरले होते, तेथें उपचारांची नीट व्यवस्था राहीना. यामुळें त्यांचें दुखणें हळूहळू वाढत चाललें होतें. अंगावर थोडी बहुत सूजहि आली होती.

सुमारें पाऊण महिना झाल्यावर बापूसाहेबांची स्वारी येथें येऊन दाखल झाली. येथें आल्यावर त्यांनां अम्मळ बरें वाटलें. आपण घरीं सुखरूप येऊन पोहोंचलों ह्मणून त्यांचे मनास मोठा आनंद झाला. परंतु एक गोष्ट जास्त व्हावयाला लागली ती ही कीं त्यांचे नाकांतून रक्त पडावयास लागलें. तापहि बराच येत असे. औषधोपचार स्वतःचेच चालू होते. एक दोन दिवस मात्र त्यांनीं डाक्टर विश्रामजींचें औषध घेतलें. पोटावर दोनदा पलिस्तरें मारिलीं होतीं. असे नानाप्रकारचे उपाय चालू होते, परंतु प्रकृतीस आराम पडण्याचें मुळींच लक्षण दिसेना.

बापूसाहेबांच्या दुखण्याच्या आरंभापासून त्यांचे पूर्वगृहसंबंधी पुतणे आणि मुलगे हे सुद्धा त्यांच्या शु-

श्रुषेंत तत्पर असत. रात्रंदिवस ते तेथें बसलेले असत. समाचाराकरितां शेंकडों मंडळी येत असे. सर्वांशीं बापू अगत्यानें बोलत. डा. विश्रामजीची स्वारी प्रतिदिवशीं बापूंच्या समाचाराकरितां येत असे. त्या वेळीं "असा विद्वान मनुष्य पुनः निपजणें कठिण असें डा. विश्रामजी वारंवार उद्गार काढीत. वेदशास्त्रसंपन्न वंडूनाना रानडे आपल्या पंचावन्न वर्षांच्या प्राणमित्राला भेटण्याकरितां दररोज दोनदां बापूंच्या येथें जात असत. श्रीमंत पंत प्रतिनिधींचें कुटुंब व श्रीमंत बाबा महाराज व त्यांचें कुटुंब अशीं मोठमोठीं राजकीय घराण्यांतील मंडळीहि ह्या वैद्यराजांचा समाचार घेण्यास हजर असत. असो.

बापूंची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली. अन्नहि वर्ज्य झालें. डाळिंबाचे दाणें वगैरे कांहीं ते खात. बापूसाहेबांच्या प्रकृतीस मुळींच बरें नाहीं असें पाहून त्यांच्या सर्व प्रियजनांस व इष्टमित्रांस फार वाईट वाटावें. पण उपयोग काय! अशी हळूहळू स्थिती होत चालली असतां माघ वद्य ६ शुक्रवार दोनप्रहरपासून बापू बोलेनासे झाले. शेवटीं त्यांनां वायू झाला. शनवारीं दोनप्रहरपासून श्वास झपाट्यानें सारखा चालला, तो संध्याकाळपर्यंत चालू होता. सुमारें दोन अडीच घटिका रात्र पडली तों अशा जगविख्यात महात्म्यानें या असार संसाराला लाथ मारून स्वर्गलोकची वाट धरिली. (माघ वद्य ८ मंदवार शके १८०९.)

ही गोष्ट बाहेर कळतांच कित्येक लोक या धन्वन्तऱ्याचें शेवटलें दर्शन घेण्यास जमले होते. सर्व घरामध्यें लोकांची गर्दी झाली. सर्वांचे वदनावर दुःखाचे मनोविकार कसे स्पष्ट दिसत होते. लोकांचा जमाव येवढा जमला होता परंतु घरातील सुर्य मावळल्यामुळें जिकडे तिकडे अंधःकारमय दिसूं लागलें, शुन्यतेनें आपला पूर्ण अम्मल बसविला. आपला धनी आज नाहींसा झाला ह्मणून गाय, हरीण, मोर, मैना, राघु, चंडोल इत्यादि पशुपक्षांच्या स्तब्धतेवरून जणुकाय त्यांनां आपला दुःखोद्वेग अन्य तऱ्हेनें दर्शवितां येत नाहीं, असा प्रेक्षकांस भास होई, आणि त्यांची त्यांनां करुणा येई. मरतेसमयीं शंभर रुपयांचा देकार झाला. भिक्षुक मंडळींची मुद्रा उत्तम दर्पणाचें काम योग्य रीतीनें बजावीत होती. संशय, चिन्ता, आनन्द, भय, अशा नानाविध वृत्तींचा कलह त्या अरशांत स्पष्ट दिसत होता. आपल्या हातांत रुपया पडतो कीं नाहीं ह्मणून त्यांचे मनांत संशय आणि काळजी उत्पन्न व्हावी. रुपया मिळतांच आपण मोठे विजयी झालों असें मनांत येऊन त्यांनां भीति वाटावी. आपलीहि स्थिती शेवटीं अशीच होणार; आपल्यालाहि शेवटीं **ओंकारेश्वरी** अग्नींत टाकणार असे विचार मनांत उत्पन्न झाले कीं त्यांनां मोठें दुःख होई आणि त्या दुःखांतच ते परत जात.

थोड्याच वेळात प्रेत नेण्याची तयारी झाली. शरीरातील आत्मा विनाश पावताच नी शरीराची अव-

स्था होते तद्वत प्रेत बाहेर नेतांच गेहरूपी शरीर निस्तेज दिसूं लागलें, आणि त्यावर प्रेतकला आली. प्रेत दहन संस्कार संबंधानें कांहीं भानगड उपस्थित होईल असें कै. बापूसाहेबांच्या कित्येक फाजिल मित्र मंडळींचे मनांत आल्यावरून त्यांनीं पोलीस आणण्याची आगाऊ व्यवस्था करून ठेविली होती. परंतु अशा प्रकारची भानगड उपस्थित होण्याचा संभव आमच्या मतें मुळींच नव्हता. मेहेंदळ्यांचें घराणें संभावीत, तें संभावीत. बापूंच्या चिरंजीवांचें आणि पुतण्यांचें तेथें नित्य येणें होतें, तें आपल्या कुळांतील मोहोरा आज हरपण्याची वेळ जवळ आली आहे कारितां आपल्या हातून जेवढी त्यांची सेवा होईल तेवढी काळजीनें करणें हेंच कायतें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांनां वाटत होतें ह्मणूनच होते. दुसरे क्षुद्र हेतु ह्या थोर पुरुषांचे मनांत कधींच शिरले नाहींत, व कधीं शिरणारहि नाहींत.

प्रेत नेतांनां मेहेंदळे मंडळींनीं असें स्पष्ट सांगितलें कीं "जसें बापू आमच्या घरांतून एक धोतरानिशी बाहेर पडले तसेंच त्यांनां आह्मी आज दहन करण्यास नेत आहों" येवढा मोठा हिरा घरांतून हरपला त्यापुढें द्रव्यादि मालमत्तेची काय प्रतिष्ठा! उत्तरक्रियेकरितां बापूंनीं एक हजार रुपये निराळे काढून ठेविले होते. त्यांतूनच सर्व संस्कार यथासांग करण्यांत आले, आणि धर्मशास्त्राप्रमाणें बापूंनां सुख व्हावें, त्यांच्या

आत्म्यास कांहीं क्लेश पडूं नयेत अशी सर्व व्यवस्था उत्तम झाली. अशा प्रकारें इहलोक त्याग करून परलोक सुखोपभोगच्छेनें त्या महात्म्यानें स्वर्गलोकास प्रयाण केलें.

# उपसंहार.

बापूंच्या एकंदर आयुष्यक्रमाचें पर्यालोचन केलें ह्मणजे कांहीं मुख्य मुख्य गोष्टी स्मरणार्ह आहेत असें विचारान्तीं दिसून येईल. परकीय राजसत्ता, परकीय राज्यबळ, परकीय राज्यस्वामित्व, परकीय राज्याधिकार, परकीय सार्वभौमत्व इत्यादिकांचा पूर्ण अम्मल जिकडे तिकडे आपलें उग्र स्वरूप धारण करून लोकांनां क्षणो क्षणीं तर्जनाविषय करीत असल्यामुळें, परवशता, विचारपारतंत्र्य, मानसिक दास्यभाव, यांणीं—शिक्षणप्राचुर्य असतांहि—सर्वांनां क्लीब करून सोडिले आहे; अशी स्थिति असतां बापूंच्या ठायीं **विचारावशता** आणि **मानसिक स्वतंत्रता** ह्या दोन अमूल्य आणि अवश्यक गुणांचा विकास बराच झाला होता असें व्यक्त होईल.

बापू पुरातन पिढीचे होते तथापि वर्तमानार्यवृत्त, आणि शिष्ट कला आणि ज्ञान, यांचा त्यांचे मनावर संस्कार झाला होता. त्यांनीं प्राचीन आर्यवैद्यकाचें अध्ययन केलें होतें, परंतु त्यांत त्यांनीं स्वाध्यापनपद्धतीची योजना केली होती.

वर्तमानकाळीं राजाश्रयाभावानें आणि कोणत्याहि प्रकारचें उत्तेजन नसल्यामुळें आपल्या प्राचीनकलांचा, प्राचीन शास्त्रांचा, ऱ्हास होत चालला आहे. कल्पनाबळानें नवीन कांहीं शोधून काढणें किंवा पूर्वी-

च्यांत कांहीं भर घालणें ही गोष्ट तर एकीकडेच राहो; परंतु जुन्याचें संरक्षण आणि पुनरुज्जीवन एवढें देखील होणें दुर्घट आणि अशक्य होत चाललें आहे. असें असतां आपल्या अत्युपयोगी, प्रभाववत्, शक्तिमत् आणि सर्वमान्य अशा आर्यवैद्यकाचें बापूंनीं उत्तम तऱ्हेनें संरक्षण करून त्याचा हजारों लोकांस फायदा करून दिला म्हणून सर्वांनीं बापूंचे उपकारी असले पाहिजे आणि म्हणूनच अशा गुणी मनुष्याचें कांहीं योग्य स्मारक करण्याच्या कामीं व्यक्ति मात्रानें यथाशक्ति सहाय्य केलें पाहिजे.

लाखों रुपये खर्चिले तरी पुनः असा मोहोरा पैदा होणें फार दुरापस्त आहे हें प्रत्येकानें लक्षांत वागवावें. बापूंच्या यशपरिमलानें लुब्ध होऊन शतशः लोकरूपी भ्रमरांचे थवेच्या थवे या पुण्यनगरींत जमत. बापूंनीं आर्यवैद्यकाचें रक्षण केलें येवढेंच नाहीं तर त्यांनीं तें प्रतिष्ठेस आणि नांवा रूपास आणिलें आणि त्याच्या दैदीप्यमान प्रभेचा अनुभव युरोपिअनांस देखील आणून दिला. आणि म्हणूनच **बिटीकान्डर**-प्रभृति **गृहस्थ** त्यांनां मान देत.

ह्या जगामध्यें सर्व खटाटोपाचें मूळ बीज, अस्तित्वाचें आदिकारण, नीती वर्तनाचा मुख्य हेतु, ज्ञानसंपादनाचें पर्यवसान असें जें सौख्य त्या सौख्याचे यथेष्ट उपभोग बहुतेकअंशीं कै० **बापूसाहेबांनां** मिळाले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

सर्व वैभव, सर्व प्रतिष्ठा, सर्व बळ, सर्व सत्ता इ-

त्यादि गोष्टी प्राप्त करून घेण्याविषयीं जी मानवी प्राण्याची प्रबलेच्छा ती बापूसाहेबांच्या संबंधानें पाहतां पूर्ण झाली होती असें दिसून येईल. सर्वांमध्यें उच्च पदवी प्राप्त करून घेणें, आपली कृपा व्हावी ह्मणून सर्व लोकांची उत्कटेच्छा असणें, शेंकडों लोकांचे मनांत स्वतःविषयीं पूज्यभाव उत्पन्न करणें, दुसऱ्यावर उपकार करण्याचें आपले ठायीं सामर्थ्य असणें, वगैरे गोष्टींवांचून ज्ञानश्रीविराजीत मनुष्याचें; अनुक्रमें, वैभव, प्रतिष्ठा, सत्तावळ, व्यतिरिक्त काय असणार!

कीर्तीविषयीं विचार करितां हिंदुस्थानच्या ह्या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत विस्तीर्ण राज्याची कीर्तिसंस्थापना त्या महात्म्यानें केली असेंच ह्मणणें भाग आहे.

बापूंच्या नांवाच्या ध्वजपताका जेथें वायूला हलविण्याचें काम नाहीं अशा प्रकारचीं स्थलें फार थोडीं सांपडतील. यावत्कालपर्यंत ह्या जगामध्यें मनुष्य प्राण्याचें अस्तित्व आहे, जोंपर्यंत सत्यास मान देणारे कांहीं तरी लोक निपजतील, जोंपर्यंत ज्ञानाची प्रतिष्ठा ठेवणें हें एक कर्तव्य मानलें जाईल, आणि जोंपर्यंत आयुर्विद्येची लोकांना गरज लागेल, तोंपर्यंत "बापूसाहेब मेहेंदळे" हें नांव लोकांच्या हृदयस्थानांत वास करील.

ज्याप्रमाणें भगवान् तेजोनिधि सूर्यनारायण आपल्या चंडकिरणतेजानें प्रकाशमान असतां परप्रकाशित तारकांची निस्तेजता दिसून येते, त्याप्रमाणें

बापूंचा ज्ञानभानु भ्राजमान होता तोंपर्यंत सर्व **पर-दत्तज्ञान वैद्यमण्डल** फिकें दिसे. जोंपर्यंत तो **नर-सिंह** आपल्या गुहेंत पडला असे तोंपर्यंत इतर नीच वनपशूंची गुहेच्या आसमंतात् भागीं तोंड करण्याची छाती झाली नाहीं, येवढेंच नव्हे तर त्याची नुसती गर्जना गुहेंतून ऐकूं येतांच त्यांच्या शरीरांस भीतीमुळें कंप सुटावा.

ज्यादिवशीं या **भिषगवर्याचें** प्राणोत्क्रमण झालें त्याचदिवशीं सच्चिकित्सक मण्डलाचें **शिरोभूषण** गळून पडलें, आणि ज्ञानशून्य वैद्यांचा दरारा नाहींसा झाला.

जनसमूहाचें **आरोग्यरक्षण**, व्याधिग्रस्तांचें **प्राण-त्राण**, प्रकृतिस्वास्थ्याचें **निधान**, सर्व रोगांचें **तीव्रोन्मूलन**, मृत्यूचेंहि **भयकारण**, सदृढतेचें उत्पादक, सत्प्रकृतीचें **पोषक; जिच्या** योगानें क्षय, **सन्निपात, महामारी**, अशा महा भयंकर घातुक रोगांचा चुराडा होतो, शेंकडों जीवांचें संरक्षण **जिच्या** सहाय्यानें उत्तम चालतें; रोग शत्रूंचा नाश करून हजारों लोकांची मुक्तता करण्याचें **जिचें सामर्थ्य**, कित्येक अपमृत्यूहि जिच्या स्वाधीन, **सर्व विद्यांचें शिरोभूषण**,विद्वज्जनाचें **मनोरंजन** अशी जी **आयुर्विद्या देवी**, तिच्या **सौभाग्य मंदिरास बापूंच्या** अन्तकाळींच **आग लागली**, आणि तिला **वैधव्य** प्राप्त झालें !

हे **आयुर्विद्ये**, तुझा असा **रसिकभोक्ता** यमसदनास तुला टाकून गेल्यामुळें तुला खरोखर महद्दुःख

झालें असेल! सहधर्मिणी आणि अंगीकृतस्त्री ह्या दोघींपेक्षां तुजवर त्याचें अधिक प्रेम! तुला जसें काय त्यानें गळ्यांतील ताईतच करून ठेविली होती! तुझा प्रिय तुला कधींहि विसरला नाहीं. तुजवांचून त्याला क्षणभर देखील करमूं नये; अशी तूं त्याला मोहनी तरी काय घातलीस बरें? तुझा त्यानें केवढा आदर करावा; किती प्रतिष्ठा ठेवावी. तूं त्याला अगदीं जीवकीं प्राण! केवढें तरी तुझें भाग्य हें!!

तुझेंहि त्याजवर तसेंच प्रेम असे. जगांत त्याची मानमान्यता करून देण्यास तूं त्याला मोठें सहाय्य करावेंस. तूंच त्याला सधन करून सोडिलेंस; तूंच त्याचा बडेलोकांशीं स्नेहभाव करून दिलास. अशा गुणीपतीच्या हातीं पडलीस ह्मणूनच तुला आपल्या सद्‌गुणांचा चांगला प्रकाश पाडितां आला आणि शेंकडों लोकांचे उपयोगी पडण्यास सांपडलें. तूं तरी मोठी शहाणीच. इतरांनां निव्वळ आशा लावून शेवटीं बापूंच्याच गळ्यांत माळ घातलीसना! तुला गुणांची खरी पारख झाली ह्मणुनच तूं त्यांनां वरिलेंस. अभाग्ये, आतां आपलें वैधव्यदुःख कसें तरी सहन कर, येवढेंच कायतें तुला शेवटचें सांगणें आहे.

समाप्त.

# महत्वाचीं शुद्धिकरणें.

—○:*:○—

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | १ | वर्चत्व. | वर्चस्व. |
| १६ | ६ | स्वत | स्वतः |
| १८ | १० | गृहस्धांची | गृहस्थांची. |
| २० | १० | व्याष्टत | व्यापृत. |
| २३ | ४ | कराघी | करावी. |
| २५ | १५ | गृहस्त्याग | गृहत्याग. |
| २८ | ६ | तेयेंच | तेथेंच. |
| ३० | ४ | वृत्तांनाकडे | वृत्तांताकडे. |
| ४० | १९ | डूं लागली | पडूं लागली. |
| ४४ | ८ | मनांत | मतांत. |
| ४५ | १० | विटीस | त्रिटीस. |
| ४५ | १५ | विटीचा | त्रिटीचा. |
| ४५ | १७ | विटी | त्रिटी. |
| ४६ | ३ | नगैरे | वगैरे. |
| ४६ | १० | अत्वस्थ | अस्वस्थ. |
| ४७ | १७ | स्नेड | स्नेह. |
| ४८ | १६ | गेण्यास्तव | घेण्यास्तव. |
| ५६ | ६ | मृसाचार | समाचार. |
| ५६ | १७ | आकर्शिल | आकर्षिले. |
| ५८ | १२ | प्रकरणेन | प्रकारेण. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | १४ | ठरविमें | ठरविणें. |
| ६२ | १९ | ननुष्याचे | मनुष्याचे. |
| ६५ | १७ | तामसर | नासभर. |
| ६८ | ३ | नमती | नसतील. |
| ६८ | ७ | फळफवळ | फळफळावळ. |
| ६७ | २ | प्रबळेच्या | प्रबळेच्छा. |